# परिवर्तनाचा वाटसरु

वर्ष २२वे / अंक १ला / किं. २५ रु. / १ ते १५ मे २०२२

**संस्थापक संपादक**

अभय कांता*

**संपादक**

प्रज्ञा दया पवार । नारायण भोसले । माधुरी दीक्षित । सुरेंद्र जोंधळे

**कार्यकारी संपादक**

देवेंद्र इंगळे । दिलीप चव्हाण

**संपादक मंडळ**

प्रज्वला तट्टे । वीरा राठोड । कलीम अजीम । राही श्रु. ग. । वृषाली मगदूम

**सहव्यवस्थापक**

प्रकाश वाघमारे

**संपर्क पत्ता**

५९/६४, कौस्तुभ अपार्टमेंट, दुकान नं. ७ ए, कसबा पेठ, फणी आळी तालमीजवळ, पुणे ४११०११
भ्र. ९७६३२०६२१२ इमेल : pwatsaru@yahoo.com वेबसाईट : www.pvatsaru.com

**वर्गणीचे दर** : वार्षिक : ६०० रु., त्रैवार्षिक : १,६०० रु., दशवार्षिक : ५,००० रु., सॉफ्ट कॉपीसाठी वार्षिक २०० रु., सॉफ्ट + छापील ७०० रु. वरील पत्त्यावर ई मनी ऑर्डर, चेक किंवा डिमांड ड्राफ्टने वर्गणी पाठवावी. 'परिवर्तनाचा वाटसरू' या नावाने चेक / डिमांड ड्राफ्ट असावा.

बँक ट्रान्सफरने वर्गणी भरण्यासाठी तपशील
बँक ऑफ इंडिया, फर्ग्युसन कॉलेज रोड शाखा, पुणे । बचत खाते : Pariwartanacha Vatsaru
बचत खाते क्र. : 051410110013969 । आयएफएससी क्र. : BKID0000514 । एमआयसीआर क्र. : 411013014
Google Pay साठीचा मोबाईल नंबर : 8888708963 । युपीआय पेमेंटसाठी वर बारकोड दिला आहे.

*पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी

ISSN: 2250-3145

युजीसी केअर ग्रुप 1मध्ये 'परिवर्तनाचा वाटसरू' पाक्षिकाचा मल्टिडिसिप्लिनरी या कोटीक्रमांतर्गत समावेश केला आहे.

अ
नु
क्र
म

संपादकीय
जत्था, जमाव, गट... आणि लोक ५
माधुरी दीक्षित

समसामायिक
हे कुणाच्याही बाबतीत घडू शकतं ७
रमा तेलतुंबडे-आंबेडकर
न्यायपालिका, हिजाबबंदी आणि... ११
नितीश नवसागरे

सिनेसामायिक
अर्धवट 'काश्मिर फाईल्स' १७
कलीम अजीम

आदरांजली
अस्सल मार्क्सवादी विचारवंत २२



प्रभात पटनाईक अनु. शैलेश जोशी

अभ्यास
ई-कचऱ्याच्या समस्येची संधी २४
समित माहोरे

शोध परिसरनीतीचा
जैविक सलोख्यासाठी-२ ३२
भारत पाटणकर

माध्यमा
मराठी मालिका : लिंगभावी दृष्टिकोनातून-२ ३५
रेणुका कड व प्रवीण घोडेस्वार

अनुवादित कथा
आस ३८
अंतोन चेखव *अनु.* इर्शाद वडगांवकर

पुस्तक ओळख
असहमतीचा खटला ४४
सुकुमार शिदोरे

आपण हे वाचलंय का?
द फॉल ४७
सत्येन होंबाळी

अंकात व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.

**शाळेची शिस्त आणि गणवेश**

न्यायालयाने गणवेशाचा संबंध शाळेच्या शिस्तीशी जोडला आहे. शाळेची शिस्त व गणवेशाचा मुद्दा चर्चेला घेतला तेव्हा अगदी सुरुवातीलाच न्यायालयाने असे अधोरेखित केले आहे की, शिक्षक, विद्यार्थी व गणवेशाशिवाय शाळेची कल्पनाच करता येत नाही. गणवेश नसलेल्या शाळेची कल्पना होऊ शकत नाही, शालेय गणवेशाची संकल्पना ही आधुनिक काळातील नसून अगदी प्राचीन गुरुकुल पद्धतीमध्ये आहे. वगैरे वगैरे...

न्यायालयाची भूमिका अशी दिसते की, हिजाब घालणे शाळेय गणवेशाच्या संकल्पनेच्या विरुद्ध आहे. म्हणून हिजाबला परवानगी देणे म्हणजे गणवेशाच्या संकल्पनेला हरताळ फासणे होईल.

याचिकाकर्त्यांचा असा युक्तिवाद होता की, जोपर्यंत एखादा कायदा स्पष्ट शब्दांत शालेय गणवेश लागू करण्याचा अधिकार प्रदान करत नाही तोपर्यंत कोणताही गणवेश लागू करता येत नाही. हा युक्तिवाद न्यायालयाने नाकारला. न्यायालयाचे म्हणणे पडले की, 'शिक्षण' हा शब्द 'अभ्यासक्रम' या शब्दामध्ये समाविष्ट आहे. कर्नाटक शिक्षण कायदा १९८३ च्या कलम ७ (२)मध्ये वापरल्या जाणारा 'अभ्यासक्रम' या शब्दाचा व्यापक अर्थ घेतला तर सरकारला शालेय गणवेश बंधनकारक करण्याचा अधिकार सुद्धा आहे. न्यायालयाचे असे म्हणणे पडले की, जरी कायद्यात स्पष्ट तरतुदी नसल्या तरीही प्रत्येक शाळेला गणवेश लागू करण्याचा अधिकार आहे.

मुळात गणवेशाची आवश्यकता का असते. गणवेशामुळे कुटुंब व स्वतः व्यतिरिक्त, बाह्य व्यक्तीची अधिसत्ता स्वीकारण्याची मानसिकता सहजपणे तयार होते. आधुनिक कालखंडामध्ये गणवेश व शिस्त यांचे एक बेमालूम समीकरण आहे. शिस्तप्रिय नागरिक तयार करण्यासाठी गणवेशाचा मोठा वाट आहे. मायकल फुको यांनी आपल्या Discipline and Punish या पुस्तकात शाळा, तुरुंग, रुग्णालये, कारखाने, इत्यादी संस्थांच्या कार्यपद्धतीतील ही साम्यस्थळे अधोरेखित केले आहेत. गणवेश घालणे हा विचार करणारा समाज निर्माण करण्यासाठी नाही तर शिस्तप्रिय समाज निर्माण करण्यासाठी गरजेचे आहे.

निवाड्यामध्ये एके ठिकाणी शाळा, न्यायालये, वॉर रूम्स आणि संरक्षण छावण्या यांची अर्ध-सार्वजनिक जागांची उदाहरणे म्हणून देण्यात आली आहे. आश्चर्य म्हणजे शाळा आणि संरक्षण शिबिरे एकाच मापाने मोजली आहेत.

याचिकाकर्त्यांनी असे प्रतिपादित केले होते की, शिक्षणाचा उद्देश बहुविधतेला प्रोत्साहन देणे हे आहे, एकरूपता किंवा एकजिनसीपणाला प्रोत्साहन देणे नव्हे, आणि म्हणूनच, विद्यार्थ्यांना गणवेश बंधनकारक करणे राज्यघटनेच्या तत्त्व व उद्देशाच्या विरुद्ध आहे. वर्गात समाजातील विविधता प्रतिबिंबित झाली पाहिजे, हा याचिकाकर्त्यांचा युक्तिवाद न्यायालयाने फेटाळून लावला.

अशी मांडणी ही पूर्णपणे चुकीची आहे असे न्यायालयाचे मत पडले. परंतु याचिकाकर्त्यांचे मत नाकारत असताना, शिक्षणाचे ध्येय ( गणवेशाचे ध्येय नव्हे शिक्षणाचे ध्येय) हे बहुविधता नसून एकरूपता आहे, असा कोणताही दाखला न्यायलय या निवाड्यात देताना दिसत नाही.

गणवेशाशिवाय शिक्षणाची संकल्पनाच होत नाही ही भूमिका सुद्धा तथ्यांना धरून बरोबर नाही. गांधीजींची 'नयी तालीम' किंवा टागोरांचे शांती निकेतन हे आधुनिक शिक्षण प्रणालीला पर्याय म्हणून पुढे आलेत. गणवेश महत्त्वाचे नसून शिक्षण महत्त्वाचे आहे असी भूमिका इथे तसेच अनेक पर्यायी शिक्षणाच्या प्रयोगांमध्ये होताना दिसते. या प्रयोगांची दखल न्यायालयाने घेतलेली दिसत नाही.

याचिकाकर्त्यांचे असे सुद्धा मत होते की, त्यांना गणवेश परिधान करण्यापासून संपूर्ण सूट नको असून त्यांना फक्त ज्या रंगाचा गणवेश आहे त्या रंगाचा

हिजाब घालण्याची मुभा पाहिजे आहे. परंतु ही मागणी सुद्धा मान्य करण्यात आली नाही.

या वरून असेच दिसते आहे की, न्यायालयाने शिक्षणाला महत्त्व देण्याऐवजी गणवेशाला अधिक महत्त्व दिले आहे. गणवेशाला सर्वसमावेशक आणि समतावादी शिक्षणाचे साधन म्हणून पाहण्याऐवजी गणवेशालाच ध्येय म्हणूनच पहिले गेले आहे.

न्यायालयाच्या म्हणण्याप्रमाणे, जेव्हा शाळा एखादा ड्रेस कोड बंधनकारक करते तेव्हा ती एका प्रकारे राज्यघटनेतील धर्मनिरपेक्षतेच्या मूल्याचे पालन करत असते. न्यायालयाने पुढे असे म्हटले आहे की, हिजाबची परवानगी दिल्यास 'सामाजिक-वेगळेपणा'ची भावना प्रस्थापित होऊ शकते, जे की इष्ट असू शकत नाही.

निकालपत्रातील न्यायालयाची ही निरीक्षणे कोणत्याही शिक्षणतज्ज्ञांच्या मतांवर किंवा एखाद्या अभ्यासावर आधारलेली नाहीत. फार तर हे शाळेतील वर्ग कसे असावेत? याविषयी न्यायाधीशांचे वैयक्तिक मत असू शकते.

**समारोप**

सदरील हिजाबचे प्रकरण न्यायालयामध्ये जाऊन सोडवावे असे बिलकुल नव्हते. केंद्रीय विद्यालयांमध्ये सुद्धा हिजाबला परवानगी दिल्याचे उदाहरण दिले होते, परदेशातील अनेक शाळा धार्मिक आणि सांस्कृतिक ओळखींना वाजवी स्थान देतात. प्रशासनाने हे प्रकरण सामंजस्याने सोडवणे गरजेचे होते. परंतु कर्नाटक सरकारने तसे केले नाही. याचिकाकर्त्यांनी न्यायालया पुढे खरे तर अगदी साधी मागणी केली होती. हिजाब बंदीचा सरकारी आदेश भेदभाव न करण्याच्या घटनात्मक हमीचे उल्लंघन करतो, म्हणून तो असंविधानिक आहे असे घोषित करावे. परंतु न्यायालय हिजाब ही मुस्लीम धर्मातील आवश्यक धार्मिक प्रथा आहे किंवा नाही या प्रश्नामध्ये गुरफटून गेले. 'सर्व शिक्षा अभियान' चालवणाऱ्या देशामध्ये, हिजाब बंदीमुळे शिक्षण बंद झाले तरी चालेल परंतु गणवेशामध्ये सूट देता येणार नाही असा पवित्रा सरकारने घेतला व तो सरकारी निर्णय रास्त असल्याचा निवाडा कोर्टाने दिला. या निर्णया विरुद्ध याचिकाकर्त्यांनी सर्वोच्च न्यायालयामध्ये अपील केले आहे. सर्वोच्च न्यायालय या प्रकारणामध्ये लवकर निकाल देईल असे काही दिसत नाही. तो पर्यंत मुस्लीम महिलांना हिजाब का किताब यामध्ये निवड करावी लागत आहे. धर्माचं अनुकरण करून शिक्षण घेता येतं असा पर्याय उरला नाही. हिजाब परिधान करून शाळेमध्ये प्रवेश मागणाऱ्या मुली स्वतःची ओळख टिकवून शिक्षणाचा अधिकार मागत आहेत. त्या सरकारच्या एकाच रंगामध्ये रंगू इच्छित नाही. त्यांची वेगळी ओळख सर्वोच्च न्यायालय मान्य करेल का हे आता पहायचं आहे.

भारतातील हिजाबचा वाद हा अनेक युरोपीय देशांमधील उजव्या विचारसरणीच्या राजकीय पक्षांनी घेतलेल्या भूमिकेसारखाच आहे. गेली अनेक वर्षे युरोपातील उजव्या विचारसरणीने आपली बरीचशी शक्ती इस्लाम आणि मुस्लीम जगताला दूषणं देण्यावर खर्च केली आहे. अफगाणिस्तान आणि इराकमधील युद्धांमुळे युरोपमध्ये निर्वासितांचा ओघ सुरू झाला. पिढ्यानपिढ्या युरोप खंडात वावरणाऱ्या मुस्लिमांनी राजकारणात अधिक अर्थपूर्ण भूमिका घ्यावी, अशी मागणी सुरू केली. त्यावर उलटसुलट प्रतिक्रिया उमटल्या, ज्यामुळे युरोपात आज इस्लाम द्वेषाचे पेव फुटलेलं आपणास दिसते.

२०१२मध्ये सार्वजनिक ठिकाणी पूर्ण बुरखा घालण्यावर बंदी घालणारा फ्रान्स हा युरोपमधील पहिला देश होता. हा निर्णय घेणाऱ्या निकोलस सार्कोझी यांच्या सरकारने म्हटले होते की, फ्रेंच संस्कृतीचे जतन करण्यासाठी आणि फुटीरतावादाला परावृत्त करण्यासाठी हे पाऊल उचलणे आवश्यक आहे. या कायद्यात इस्लाम किंवा विशेषतः स्त्रियांचा उल्लेख नव्हता, परंतु

**(पान क्र. ३७वर)**

# अर्धवट 'काश्मिर फाईल्स'

(उत्तरार्ध)

कलीम अजीम

सिनेमात दाखविलेल्या एका सत्याप्रमाणे काश्मिरचे प्रशासनिक अधिकारी वारंवार दिल्लीत संदेश पाठवित होते. परंतु दिल्लीतून (भाजपचे नेत्यांकडून) त्यांना कोणतेही सहकार्य मिळत नव्हते. त्यावेळी विरोधी पक्षनेते राजीव गांधींनी संसद भवनाचा घेराव केला. त्यानंतर सिंग सरकारने जम्मू-काश्मिरच्या परिस्थितीवर नियंत्रण मिळवण्यासाठी सीमा सुरक्षा दलाची कूमक पाठवली. तोपर्यंत भाजपवाले नुसते मंडल आयोगाच्या विरोधाचा राग आळवत होते आणि तमाशा बघत होते.

त्याचा पुरावा २५ सप्टेंबर १९९०च्या 'हिंदुस्थान' वृत्तपत्राच्या पहिल्या पानावरून मिळतो. पत्राची पहिली बातमी आत्मदाह करून मंडल आयोगाचा विरोध केल्याने एका विद्यार्थ्यांचा मृत्यू, दुसरी बातमी आडवाणींची रथयात्रा सुरू झाल्याची होती. तर तिसरी मोठी बातमी वाजपेयींनी कोर्टाचा निर्णय येईपर्यंत आरक्षण लागू करू नये, अशी घोषणा केल्याची आहे. पुढच्या महिन्यांत आडवाणींना अटक झाल्याने भाजपने सिंग सरकारचं समर्थन काढून घेतलं होतं.

यातले अजून एक वास्तव असं की, काश्मिरचे तत्कालीन मुख्यमंत्री फारुख अब्दुल्ला यांनी पदाचा राजीनामा दिला. (त्यांचेदेखील विकृत चित्रण सिनेमात केलेलं आहे. त्यांना दहशतवाद्यांशी संधान साधणारा नेता म्हणून दिग्दर्शकाने सादर केलं आहे. उमर अब्दुल्ला यांनी दिग्दर्शकाने खोटी माहिती प्रसारित करून दिशाभूल केल्याचा आरोप केला आहे.) त्यानंतर तिथं राष्ट्रपती राजवट लागू झाली. जगमोहन मल्होत्रा नावाचे गृहस्थ तिथं प्रशासक म्हणून पाठविण्यांत आले. जगमोहन भाजपचे सक्रिय पुढारी होते. पुढे ते वाजपेयी सरकारमध्ये मंत्रीही झाले. त्यांच्यावर आरोप आहे की, त्यांनी काश्मिरी पंडितांना सुरक्षा पुरवण्याऐवजी विस्थापनाला उत्तेजन दिलं. याचा दुजोरा स्थलांतरित काश्मिरी पंडितांनी 'अल सफा' नावाच्या स्थानिक उर्दू वृत्तपत्राच्या संपादकांना मट्टू यांनी पाठवलेल्या पत्रातून मिळतो.

२२ सप्टेंबर १९९० रोजी पाठवलेल्या ह्या पत्रात मट्टू यांच्यासह सुमारे २३ काश्मिरी पंडित नागरिकांच्या सह्या आहेत. पत्रात त्यांनी स्पष्टपणे लिहिलं आहे की, काश्मिरी पंडित समाजाला जगमोहन तसेच आपल्या समाजातील काही स्वयंभू नेते व इतर स्वार्थी पुढाऱ्यांनी बळीचा बकरा बनविले आहे. हे नाट्य भाजप, आरएसएस सारख्या हिंदू जातीयवादी संघटनांनी रंगवले होते.

भारतीय भांडवलदारांची नजर काश्मिरच्या व्यापारावर आहे, त्यातून सदरील कारस्थान रचलं जात आहे, असं सांगत पुढे लिहिलं आहे,

लेखक पुणेस्थित असून मुक्त पत्रकार आहेत.
ईमेल- kalimazim2@gmail.com

जागतिक समुदायाला खऱ्या समस्येपासून अनभिज्ञ ठेवायचं आणि (भारतीय) व्यापाऱ्यांच्या अभद्र कारस्थानावर पांघरुण घालायची ही कल्पना होती.

हे पत्र के. एल. कौल यांच्या पत्राला उत्तर म्हणून लिहिण्यात आलेलं होतं. कौल यांनी १८ सप्टेंबर १९९० रोजी 'अल सफा'च्या संपादकाला लिहिलं होतं (मट्टू यांनी आपल्या उपरोक्त लेखात हे पत्र दिलं आहे), पंडितांना सांगण्यात आलं आहे की सरकारला काश्मीरमधील एक लाख मुस्लिमांना मारायचं आहे, जेणेकरून दहशतवाद पूर्णतः संपुष्टात येईल. जम्मूमध्ये गेल्यावर पंडितांना मोफत रेशन, घरे, नोकऱ्या इत्यादी देण्यात येणार असल्याचंही सांगण्यात आलं. हत्याकांड संपल्यानंतर त्यांना परत आणलं जाईल, असं त्यांना सांगण्यात आलं. (ग्रेटर काश्मिर, १७ ऑगस्ट २०१६)

बलराज पुरी यांनीदेखील आपल्या 'कश्मीर : टूवर्ड इंसरजेंसी' पुस्तकात जगमोहन यांच्यावर ठपका ठेवला आहे. हिंदू राष्ट्र उभारणीची कथा पंडितांना सांगून त्यांना स्थलांतर करण्यास प्रवृत्त केलं, असं पुरी यांनी लिहिलं आहे. (पृष्ठ, ७०-७१) मट्टू म्हणतात, मार्च १९९०मध्ये 'कमिटी फॉर इनिशिएटिव्ह ऑन काश्मीर'च्या वतीने खोऱ्यातील पंडितांच्या स्थलांतराच्या मुद्द्यावर उत्तर देताना तत्कालीन मुख्य सचिव आर. के. कपूर म्हणाले, खोरे सोडण्यासाठी पंडितांना वाहने उपलब्ध करून देणं, हे सरकारचं धोरण नसायला पाहिजे होतं. ते तर सरकारी अधिकारी वैयक्तिक करू शकले असते.

चित्रपटात पीएम साहेब असा उल्लेख वारंवार येतो, परंतु त्या पीएम साहेबांचं नाव मात्र उघड होत नाही. शिवाय काश्मिरीयतचा प्रचार राबविणाऱ्या वाजपेयींवर काश्मिर प्रश्न चिघळता ठेवण्यासाठी दोषारोप ठेवण्यात आला आहेत. भाजप समर्थकांकडून प्रथमच अशा रीताने वाजपेयींवर टीका झालेली दिसते.

चित्रपटात अभिनेता चिन्मय मांडलेकरने बिट्टा नावाच्या एका दहशतवाद्याची भूमिका साकारली आहे. परंतु हे पात्र यासिन मलिकचं अधिक वाटतं. कदाचित 'क्रिएटिव्ह फ्रिडम' हणून दिग्दर्शकाने दर्शकांना अंधारात ठेवलं असेल. हेच 'फ्रिडम' घेत असंही दाखवलं आहे की, १९९० साली युवा असलेला बिट्टा २०२० साली त्याच तारुण्यात जेएनयूच्या विद्यार्थी निवडणुकांचं नेतृत्व करतोय! स्मरण असावं की, टेरर फंडीग केसमध्ये तो आणि मलिक २०१९पासून तुरुंगात आहेत.

अर्थात जेएनयूतील विद्यार्थ्यांवर भाजपकडून होत असलेले देशद्रोहाचे आरोप सिनेमातही 'क्रिएटिव्हली' वापरण्यात आलेले आहेत. तसंच तिथले प्राध्यापक देशविरोधी कारवायामध्ये लिप्त असल्याचं नाट्यमयरित्या दाखवलं आहे. एका अर्थाने दिग्दर्शकाने जेएनयू विद्यापीठाला दहशतवादी कृत्याशी जोडलं आहे.

सिनेमात अनेक ठिकाणी तपशिलाच्या असंख्य चुका आढळतात. प्रत्यक्षात घडलेल्या वेगवेगळ्या घटनांना एकाच कथासूत्रात रुपांतरित करून दाखवलं आहे. कलावंत म्हणून अनुपम खेर यांनी अभिनय उत्तम केलेला आहे. परंतु इतर कलावंतांचा अभिनय फारच सुमार व कृत्रिम वाटतो. अभिनेते मिथून चक्रवर्ती प्रशासनिक अधिकाऱ्याच्या भूमिकेत आहेत. त्यांचे वाढते वय पाहता त्यांना दोन-तीनदा अतिरिक्त बढती देऊन त्या पदावर ठेवण्यात आल्याचं दिसतं. अर्थात ते भाजपचे सदस्य (कोब्रा) असल्याने त्यांचं पुनर्वसन करण्यात आलं असावं. पल्लवी जोशी प्राध्यापिकेच्या भूमिकेत खूपच बटबटीत व भडक वाटतात. पहिल्या दृश्यापासून त्यांच्या डोळ्यात संशय व अविश्वास ठासून भरण्यात आलेला आहे.

चिन्मय मांडलेकर यांचे पात्र नैसर्गिक कमी तर स्टिरिओटाइप्ड अधिक वाटते. नायक दर्शनकुमार व्हॉट्सॲप विद्यापीठाच्या माहिती व प्रचार जंजाळात गुरफटलेला युवक शोभून दिसतो. कन्हैय्याकुमारचं पात्र त्याच्या वाट्याला आलेलं आहे. शेवटचं भाषण देताना तो विद्यार्थी नव्हे तर भाजपचा गोदी मीडिया टाईप प्रवक्ता अधिक वाटतो.

**सांप्रदायिक धोरण**

काश्मिरी पंडितासोबत अन्याय झाला हे उघड सत्य आहे. त्यांच्या व्यथांना अनेक पुस्तके, रिपोर्ट, अहवाल, माहितीपटातून पर्याप्त जागादेखील मिळाली आहे. त्यांचा दहशतवाद्यांकडून झालेला अमानुष छळ आजही चर्चेचा विषय असतो. त्यामुळेच तर त्यांना केंद्रीय व स्थानिक सरकारने निवारा, विविध सवलती, आरक्षण दिलेले आहे.

काश्मिरबाहेर देशात विविध ठिकाणी स्थलांतरित होऊन ते सेटल झालेले दिसतात. पहिली पिढी मात्र स्वगृही परतण्याची आस घेऊन आहे. त्यातील अनेकजण (३,८०० परत गेले असं भाजपनं संसदेत सांगितलं आहे.) परतलेदेखील. परंतु पर्याप्त रोजगाराची साधने नसल्याने अनेकांना परतण्याची इच्छा नाही. नव्या पिढीला खोऱ्याविषयी फारसं आकर्षण नाही. किंबहुना बहुतेकजण शहरी लाइफस्टाइल सोडून काश्मिरला परत जाऊ इच्छित नाहीत.

उदाहरण द्यायचं झाल्यास अनुपम खेर मुंबईची सिने इंडस्ट्री सोडून परत गावी जाऊन शेती करू शकणार आहेत का? ३० वर्षांत संघर्षातून मिळवलेलं सगळं सोडून ते पुन्हा खोऱ्यात कसे जातील? दुसरीकडे केंद्रिय सत्तेनेदेखील काश्मिरींबद्दल योजलेले सैन्य धोरण व विकास धोरणात दाखवलेली औदासिन्यता बरंच काही सांगून जाते.

दुसरीकडे भांडवलदारांचे काश्मिरमध्ये भू-राजकीय संबंध दडलेले आहेत. ३७० कलम हटवून भाजपने भांडवलदारांना तिथं आमंत्रित केलेलं आहे. त्यामुळे बाहेरचे लोंढे काश्मिरमध्ये वाढणार आहेत. तिथल्या नैसर्गिक संसाधनासोबत स्थानिक संस्कृतीपुढेदेखील मोठं आव्हान उभं राहू शकतं. भाजपने देशातील इतर हिंदूना काश्मिरमध्ये वसवण्याचे धोरण आखलेलं दिसतं. त्यातून बाहेरचे व मूलनिवासी असा संघर्ष वाढण्याची शक्यता नाकारता येणार नाही.

काश्मिरी पंडितांच्या छळाचं भांडवल करणारा भाजप गेल्या आठ वर्षांपासून सत्तेत आहे. पण त्यांनी पंडिताच्या घर वापसीसाठी काही प्रयत्न केलेले नाहीत. १४ मार्च रोजी लोकसभेत काश्मिर स्थितीवर चर्चा झाली. चर्चेत गेल्या ३१ वर्षांत काश्मिरी पंडितांच्या हत्येचा आकडा खासदार असदुद्दीन ओवैसींनी समोर ठेवला. माहिती अधिकारातून काढलेली माहिती त्यांनी पटलावर ठेवली, ती संख्या ८९ होती. शिवाय अतिरेक्यांनी १,५०० बिगर पंडित हिंदूंनाही मारले, त्यांच्याबद्दल कोणी अश्रू का ढाळत नाही, असेही ओवैसी यांनी विचारले.

पंडितांच्या हत्येबाबत वेगवेगळे दावे केले जातात. कोणी १००, २०० तर, कोणी ७०० म्हणतो. परंतु भाजपा सरकारचे गृहमंत्रालय २१९चा आकडा देतो. तर विवेक अग्निहोत्री ४,००० देतात आणि भाजपवाले १ लाख म्हणतात. त्याच काळात २०००पेक्षा अधिक स्थानिक मुस्लिमांना दहशतवाद्यानी मारले, असे लेखक अशोककुमार पांडेय संबंधित पुस्तकात लिहितात.

वास्तविक परिस्थिती देशासमोर येण्यासाठी तपास आयोग स्थापन करण्याची गरज आहे. परंतु केंद्र सरकारने भावनिक राजकारण करण्यापलीकडे काहीच केलेलं दिसत नाही. ओवैसींनी स्वतंत्र तपास आयोग स्थापन करावा, अशी मागणी लोकसभेत त्यादिवशी केली.

वेगवेगळे अहवाल सांगतात की, दहशतवादी हल्ले आणि सुरक्षा रक्षकांसोबत झालेल्या चकमकीत गेल्या ३० वर्षांत लाखभर काश्मिरी नागरिक मारले गेले. पण ह्या निष्पाप नागरिकांबद्दल सरकारकडे संवेदना नाहीत, असं दिसते. फक्त २१९ पंडिताच्या मृत्युबद्दल भाजप-संघ आकांडतांडव करतात. दुसरीकडे 'नेल्ली हत्याकांड' असो वा 'गुजरात दंगली'तील मृत्यूंना खोटं ठरवतात.

काश्मिरी पंडित अमाप सवलती लाटून केंद्रीय प्रशासनामध्ये विविध ठिकाणी सेटल झालेले आहेत. स्थानिक काश्मिरी मुस्लिम मात्र अजूनही छळ सोसत आहेत. बकालपणा, उपेक्षा, बेरोजगारी व आर्थिक दारिद्र्य स्वीकारून न केलेल्या गुन्हाची शिक्षा भोगत आहेत. मद्दू काश्मिरी पंडितांच्या ह्या स्वार्थी वृत्तीवर

बोट ठेवतात. संबंधित लेखात त्यांनी म्हटलं आहे, मागे वळून पाहिल्यास असं दिसून येतं की या समाजाचा दृष्टिकोन नेहमीच संधिसाधू आणि अदूरदर्शी राहिला आहे. ते नेहमीच 'शासक वर्गा'च्या सोबत राहिले आहेत. काश्मीरच्या इतिहासाच्या सध्याच्या टप्प्यात त्यांनी या समस्येकडे आपला सांप्रदायिक दृष्टिकोन पुन्हा एकदा दाखवून दिला आहे.

ते पुढे लिहितात, मुस्लिमविरोधी धोरणांसाठी कुप्रसिद्ध असलेल्या भाजपशी जुळवून घेणे त्यांच्यासाठी वाजवी नव्हते. त्यांनी खोऱ्यातील मुस्लिम नरसंहाराचा अवलंब करणाऱ्या जगमोहन यांना पाठिंबा दिला आणि आज त्यांनी भारतीय मुस्लिमांच्या राजकीय आणि सांस्कृतिक विनाशावर विश्वास ठेवणाऱ्या आरएसएस, विश्व हिंदू परिषद आणि इतर उजव्या विचारसरणीच्या हिंदू गटांना आपला संपूर्ण पाठिंबा दिला आहे.

### हिंसेला उत्तेजन

संबंधित सिनेमात 'जिनोसाइड' शब्द वारंवार उच्चारण्यात आलेला आहे. साहजिकच या कृतीचा उद्देश दर्शकांच्या हिंसेला उत्तेजन देण्याचा असावा. अनेक वेळा कॅमेरा काही विशिष्ट घटनांकडे दर्शकांचं लक्ष वेधतो. एक प्रकारे सिनेमांतील काही दृश्ये दर्शकांना हिप्नोटाइज करतात. सिनेमा प्रारंभीपासूनच संमोहनाचं शास्त्र म्हणून काम करतो. त्यातील दृश्ये हिंसा, विद्वेष, तुच्छता आणि तिरस्काराला जन्माला घालतात.

वरवर पाहता हा विषय जेवढा सहज वाटतो तसा नाही. हिंसेला उत्तेजन देण्यासाठी एक नियोजनबद्ध कृती कार्यक्रमाची व तसे मानस घडवण्याची सुप्त तयारी करण्यात आलेली दिसते. शेवटची दहा-एक मिनिटाची. दृश्यं खूपच प्रक्षोभक, विकृत व हिंसक असल्याने विचलित करतात. आरा मशिनवर एका स्त्रीला उघडपणे चिरण्यात आलेल्या दृश्यांना सेन्सॉर बोर्डाने परवानगी कशी नाकारली दिली, असा प्रश्न पडतो. २४ लोकांना उभे करून अतिरेकी बंदुकीने शूट करतात हे दृश्य पडद्यावर बघणे असह्य आहे. (वास्तविक अशा दोन घटना घडलेल्या आहेत एक १९९८ साली वंधामा गावात तर दुसरी २००३ साली नादीमार्ग येथे.) कुठलाही मनुष्य ही किळसवाणी दृश्ये पाहू शकत नाही. परंतु निर्मात्याने विशिष्ट हेतू पूर्ण करण्यासाठी ही दृश्ये कोंबली आहेत.

शेवटी लहान मुलाला अतिरेकी मारतात. हा सीन पडद्यावर काही काळ स्थिर ठेवण्यात आलेला आहे. सदरील दृश्य हिंसक भावनांना वाट करून देऊ शकतो. हे चित्रण काश्मिरीच नव्हे तर एकूण मुस्लिमाविरोधात चीड, घृणा निर्माण करते. द्वेष, राग, सूडभावनेला प्रवृत्त करतो. सिनेमा बहुसंख्य समाजात अस्मिता व अस्तित्त्वाचे संकट उभे करतो. मृत्यू व धर्मांतराची अनामिक भीती संबंधित वर्ग घटकांत रुजवण्यास सिनेमाने यश मिळवलं आहे.

हेच कारण आहे की, सिनेमा संपल्यानंतर अनेक ठिकाणी चित्रपटगृहात वादावादी झाली. असे अनेक व्हिडियो सोशल मीडियावर व्हायरल होत आहेत. प्रत्येक व्हिडियोमध्ये दिसतं की, सर्वच ठिकाणी मुस्लिमविरोधी घोषणाबाजी सुरू आहे. मुस्लिमांना चिरडून टाकण्याची, पृथ्वीतलावरून नष्ट करण्याची, त्यांचा वंशविच्छेद घडविण्याची भाषा बोलली जात आहे.

अशाच एका व्हिडियोत एक तरुण उपस्थितांना संबोधित करत म्हणतो, इथं उपस्थित असलेल्या प्रत्येकांनी एका-एका मुस्लिम मुलीशी लग्न करून तिचं धर्मांतर करावं. अशा रीतीने लवकरच आपण मुस्लिमांचं संख्याबळ कमी करू शकू. दुसऱ्या एके ठिकाणी एक माजी सैन्य अधिकारी मुस्लिमांविरोधात हिंसेची भाषा करत उपस्थितांना वांशिक युद्ध छेडण्यास प्रवृत्त करतो.

एरवी अहिंसक असणाऱ्या व्यक्तीलाही हा सिनेमा हिंस्र व रानटी बनवू शकतो. शिवाय समाजात कलह माजविण्यासाठीदेखील कारणीभूत ठरू शकतो. सिनेमा

पाहून अनेक राजकीय नेते पत्रकार परिषदा घेत आहेत, प्रक्षोभक विधाने करीत आहेत. सत्याचा शोध घेणाऱ्यांनी सिनेमा पाहावा, असे विधान मोहन भागवत यांनी केलं. (प्रमोशनसाठी सिनेमा टीमने त्यांची भेट घेतली त्यानंतर त्यांनी हे विधान केलं.) मनोहर भिडे यांनी इस्लाम आणि भारतीय मुस्लिमांविरोधात प्रक्षोभक विधान केलं. अशा स्फोटक वक्तव्यामुळे सांप्रदायिक घटकांना इंधन मिळू शकते.

चित्रपट वेदना, आक्रोश, आक्रंदन व भेदकता मांडण्यात यशस्वी झालेला आहे. परंतु तेवढाच तो अतिशय स्फोटक व तीव्र गतीने हिंसेला प्रवृत्त करणारादेखील झालेला आहे. मानसशास्त्राचा अभ्यास सांगतो की, देश, धर्म, भाषा, वंश या हिंसाचारामागच्या प्रमुख प्रेरणा असतात. संबंधित घटक मानवी मनात अत्यंत उदात्त भावनाही निर्माण करू शकतात तसेच तिरस्कारदेखील प्रसवू शकतात. हिटलरच्या सत्तेत ह्याच घटकाने ज्यू धर्मियांचं निर्वंशीकरण करण्याला बळ दिलं. (त्यानेदेखील आपली क्रूरता लपविण्यासाठी अनेक प्रचारी सिनेमे तयार केले होते. आजही त्याचे समर्थक सिनेमे बनवून हिटलरच्या 'व्हिक्टिमहूड'ची चर्चा करीत असतात. परंतु त्याने हिटलरचा क्रूर इतिहास मात्र बदलू शकला नाही.) ठरवून किंबहुना भारतात केंद्रीय सत्तेने इस्लाम व मुस्लिम विरोधी प्रचार राबवूनच राजकीय सत्ता मिळवली आहे. त्यांनी ह्या विद्वेषी प्रचारात लाखोंच्या संख्येने आपल्या समर्थक गटांना उतरवलं आहे. संबंधित सिनेमा हा त्याच मोहिमेचा एक भाग आहे. भविष्यातही असे सिनेमे काढले जातील व मोदींच्या राजकीय हिंदुत्वाचे पोषण केलं जाईल.

अखेर असं म्हणावं लागतं की, अल्पसंख्याकविरोधात हिंसेला उत्तेजन देण्यासाठी, बहुसंख्य समूहाला उन्मादी झुंडीत रुपांतरित करण्यासाठी तर हा सिनेमा निर्मिला नसावा? सिनेमात मिथून चक्रवर्तीच्या तोंडी एक वाक्य आहे. त्या वाक्यातून सिनेमा एका वाक्यात निकाली काढता येऊ शकतो.

यह एक सिविलायजेशन का वॉर है। भारत की हजारों साल पुरानी सभ्यता के खिलाफ जिहाद हैं...

होय, खरंच बहुसांस्कृतिक भारतीय सभ्यतेविरोधात 'अर्धवट फाइल्स' घेऊन निर्माता, कलावंतांनी पुकारलेलं हे धर्मयुद्ध आहे. हा चित्रपट म्हणजे मुस्लिम समुदायाविरोधात उघडपणे बहुसंख्याकांना भडकावण्याचं एक धारदार शस्त्र आहे. मोदींच्या राजकारणात हिंसा आणि विद्वेष हिंदुवादी राजकारणाचं मूलतत्त्व मानलं जात आहेत. त्या मूलतत्त्वांना हा सिनेमा बळकटी प्रदान करतो, असं खेदाने म्हणावं लागतं.

सिनेमात दाखवलेल्या एकांगी, अर्धवट व अनैतिहासिक माहितीवरून काश्मिरी पंडितांच्या समस्येविषयी मते तयार करणे इतिहासावर अन्याय करण्यासारखे होईल. त्यामुळे वास्तव जाणून घेण्यासाठी या विषयावरील पुस्तके वाचायला हवीत. संबंधित विषयावर शेकडो वस्तुनिष्ठ ग्रंथ उपलब्ध आहेत. लाखो रिपोर्ट, अहवाल, माहितीपट प्रकाशित झाले आहेत. घटनेचं यथायोग्य विश्लेषण करणारे, वास्तवाला भिडणारे, विविध बाजू आणि व्यामिश्रता सांगणारे अनेक संदर्भ उपलब्ध आहेत. ते वाचून, समजून घेऊन सिनेमात मांडलेल्या प्रसंग व घटनांची शहानिशा करता येऊ शकते आणि अज्ञानातून निर्माण झालेल्या हिंसेला वेळीच आवर घालता येऊ शकते.

●

(सौजन्य : कर्तव्य साधना)


परिवर्तनाचा वाटसरू

वर्गणीदारांनी आपला व्हॉट्स ॲप क्रमांक 'परिवर्तनाचा वाटसरू'च्या ९७६३२०६२१२ या व्हॉट्स ॲप क्रमांकावर कळवावा. आपल्या सर्व तक्रारींची दखल तातडीने घेतली जाईल.

– सहव्यवस्थापक

आदरांजली

# अस्सल मार्क्सवादी विचारवंत

प्रभात पटनाईक

प्राध्यापक एजाज अहमद यांचे ९ मार्च २०२२ रोजी निधन झाले. ते आपल्या काळातील अस्सल, अलौकिक असे मार्क्सवादी विचारवंत होते. त्यांना केवळ अस्सल अभिजात मार्क्सवादी म्हणता येईल. मार्क्सवादाला अधिक वास्तववादी बनवण्याचे सोंग घेऊन परक्या आणि प्रतिकूल विसंगत अशा संकल्पना मार्क्सवादी विचारविश्वात आयात करून अवास्तव गढूळ संमिश्रणे घडवण्याच्या प्रयत्नांना त्यांनी आयुष्यभर कडाडून विरोध केला. त्यांचा सुप्रसिद्ध ग्रंथ 'इन थियरी : क्लासेस नेशन्स अँड लिटरेचर' हा होय. त्यात त्यांनी एडवर्ड सैद यांच्या ओरिएंटॅलिझम (पौर्वात्यवाद) या तात्त्विक प्रवाहाचे चिकित्सा व खंडन केले असून अभिजात मार्क्सवादी विचार परंपरेची सर्वोच्च, सर्वश्रेष्ठ महत्ता प्रस्थापित केली आहे. ते एक अस्सल मार्क्सवादी विचारवंत होते आणि त्यांच्या विद्वत्तेने साहित्य, समीक्षा, इतिहास, तत्त्वज्ञान, व्याकरण आणि राजकीय अर्थशास्त्र अशा अनेक विद्याशाखांना कवेत घेतले होते आणि त्यांच्या राजकीय भाष्यकथनातून त्यांनी नित्याच्या जीवन व्यवहारातील सामान्य क्षुद्र भासणाऱ्या प्रत्येक सूक्ष्मतर प्रसंगाची तपशीलवार दखल घेऊन आपल्या समकालीन समग्र जीवनवास्तवाचे सम्यक आकलन आपल्याला करून दिले.

एजाज यांचा जन्म १९४१ साली उत्तर प्रदेशातील एका सधन जमीनदार कुटुंबात झाला. परंतु भारत देशाच्या फाळणीच्या काळात या कुटुंबाने पाकिस्तानात स्थलांतर केले. त्यांच्या उतारवयात त्यांना एकदा त्यांच्या पूर्वजांच्या गावी भेट देण्याचा सुदैवी प्रसंग आला आणि त्यावेळी तेथील सामान्य लोकांनी त्यांचे उबदार आगत-स्वागत केले. त्यामुळे एजाज हेलावून गेले. त्या लोकांनी एजाज यांना यापूर्वी पाहिले सुद्धा नव्हते.

एजाज अहमद यांनी अमेरिका व कॅनडा या देशातील विभिन्न विद्यापीठात अनेक वर्षे विद्यार्थ्यांना शिकवले त्यात टोरोंटोच्या यॉर्क विद्यापीठाचाही समावेश होता. हे विद्यापीठ फार आधीच्या काळापासून सृजनशील व पारंपरिक सुधारक विचारांचे केंद्र होते. भारतात परत येण्याआधी तब्बल दोन दशकांपासून तेच त्यांचे जिव्हाळ्याचे घर झाले होते. भारतात आल्यानंतर नेहरू मेमोरियल म्युझियम व लायब्ररी येथे प्राध्यापक व विद्वज्जन सभेचे सन्माननीय सदस्य बनले. त्याचप्रमाणे जवाहरलाल नेहरू विद्यापीठाच्या 'सेंटर फॉर पोलिटिकल स्टडीज्' येथे निमंत्रित प्राध्यापक बनले. तसेच जमिया मिलिया इस्लामिया विद्यापीठात खान अब्दुल गफार खान अध्यासनावर सुद्धा त्यांची

लेखक नवी दिल्लीस्थित जवाहरलाल नेहरू विद्यापीठाचे निवृत्त प्राध्यापक असून ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ आणि राजकीय विश्लेषक आहेत.
ईमेल- prabhatptnk@yahoo.co.in

नेमणूक झाली. ते 'फ्रंटलाईन' पाक्षिक तसेच 'सोशल सायंटिस्टट व 'मार्क्सिस्ट' यांसारख्या डाव्या विचारसरणीच्या नियतकालिकांचे नियमित लेखक बनले. लेफ्टवर्ड बुक्स सारख्या प्रतिष्ठित डाव्या प्रकाशनसंस्थेशी सुद्धा ते सुरुवातीपासूनच निगडित होते. खरं तर त्यांची उत्तर काळातील अनेक पुस्तके लेफ्टवर्ड प्रकाशनसंस्थेने प्रकाशित केली होती.

एजाज यांची भारतातील उपस्थिती व वास्तव्य या देशातील डाव्या विचारसरणीच्या बौद्धिक व राजकीय जीवनाला अलौकिक प्रेरणास्त्रोत होती. त्यांनी अनेक सार्वजनिक व्याख्याने दिली आणि डाव्या विद्यार्थी संघटना व गट तसेच डाव्या साहित्य सांस्कृतिक समुदायांच्या कार्यक्रमांची आमंत्रणे त्यांनी कधीही नाकारली नाहीत आणि समकालीन राजकीय मुद्द्यांवर प्रखर व ठाम भूमिका घेण्यात कधीही कुचराई केली नाही. मग या भूमिका डाव्या विचार समुदायात कितीही विवादास्पद का असेनात. असे सर्व मुद्दे त्यांनी अत्यंत काटेकोर बौद्धिक वैचारिक शिस्तीने तपशीलवार हाताळले. अर्थातच अशा वादवादंगात विरोधी पक्षात असलेल्या कुणालाही अशा तगड्या बौद्धिक वैचारिक मांडणीशी खूपच ताकदीने भिडावे लागत असे. आणि अर्थातच अगदी त्यांच्या मांडणीशी असहमती दर्शवताना सुद्धा विरोधकांना त्यांच्याकडून नेहमीच बरेच काही शिकण्यास मिळत असे

एजाज यांना भारतातील वास्तव्य म्हणजे सर्वथा स्वगृही असल्यासारखे वाटत असे. त्यांच्यासारख्या सामाजिक पार्श्वभूमी लाभलेल्या मला भेटलेल्या इतर कुणाही भारतीयांपेक्षा ते अधिक भारतीय होते. प्रगत भांडवलदारी जगात सर्वत्र वास्तव्य करून झाल्यानंतर आणि जगातील सर्वात प्रतिष्ठेची पदे भूषवून झाल्यानंतर अखेर त्यांनी भारतातच परत येऊन वास्तव्य करण्याचा निर्णय केला होता आणि तरीही उपरोधाने म्हणायचं तर ते पाकिस्तानचे थोड्या काळाकरिता का होईना नागरिक होते, ही बाब भारत देशात कायम वास्तव्य करणाच्या औपचारिक निर्णयाच्या आड येत असेल आणि एखाद्याला आपले घर वाटावे अशा देशात स्थायिक होता न येणे ही विशिष्ट बाब त्यांच्यासाठी कायमची कटकटीची बनली होती. त्यामुळे त्यांना आयर्विन येथील कॅलिफोर्निया विद्यापीठात चालून आलेले तौलनिक साहित्य अभ्यास अध्यासन स्वीकारणे भाग पडले. हे पद एकेकाळी फ्रेंच तत्त्वज्ञ जॅक्स देरीदा यांनी भूषविले होते. परंतु जेथे त्यांचे असंख्य मित्र व कॉम्रेडस यांचा गोतावळा होता आणि आयुष्याच्या अशा टप्प्यावर जेव्हा गात्रे थकली आहेत आणि एखाद्याला देशोदेशी फार वणवण भटकावे लागू नये असा भारत देश सोडून इतर देशात जावे लागणे हे त्यांना खूपच मनस्ताप देणारे व उद्वेगजनक होते.

एके दिवशी आमच्या चर्चेत भारत देशाच्या फाळणीचा मुद्दा आला असता एजाज यांनी मला मौलाना आझाद यांचा एक किस्सा सांगितला. फाळणीपूर्व काळातील मुस्लिम लीगच्या काही अनुयायांनी मौलाना आझाद यांना फाळणीच्या कल्पनेला पाठिंबा देण्यास सुचवले. त्यांच्या विनंतीचा शेवट अशा धोक्याच्या इशाऱ्याने केला की, या देशाची फाळणी झाली नाही तर पुढची शंभर वर्षे सतत वेदनामय वितंडवाद घडत राहतील. तेव्हा मौलाना आझाद यांनी त्यांना प्रत्युत्तर दिले की, या उलट या देशाची फाळणी झाली तरच पुढची शंभर वर्षे सतत वेदनामय वितंडवाद झडत राहतील. दुर्दैवाने आपण अजूनही त्या शंभर वर्षांच्या काळातच जगत आहोत आणि या काळात एजाज अहमद यांच्यासारख्या सूज्ञ व क्रांतदर्शी विचारवंत गमावणे हे कधीही भरून न येण्यासारखे नुकसान होईल आणि त्यांच्या मित्रांसाठी ज्यात गणले जाण्याची सुसंधी मला मिळाली त्यांच्यासाठी तर ही एक खोल व्यक्तिगत हानी होय.

●

द हिंदू वर्तमानपत्राच्या सौजन्याने दहा मार्च दोन हजार बावीस

**अभ्यास**

# ई-कचऱ्याच्या समस्येची संधी

समित माहोरे

भारत जगामध्ये वेगाने प्रगती करणारा आणि सर्वात जास्त लोकसंख्या असलेला दुसऱ्या क्रमांकाचा देश आहे. चालू किंमतीमध्ये सकल राष्ट्रीय उत्पादनात भारत जागतिक स्तरावर सहाव्या स्थानावर आहे आणि क्रयशक्ती समतेची तुलना करता आपण तिसऱ्याच क्रमांकावर येतो. आज भारतातील सर्वच क्षेत्र वेगाने वाढताना दिसून येतात. त्यातल्या त्यात इलेक्ट्रिक आणि इलेक्ट्रॉनिक उद्योग हा वेगाने वाढणाऱ्या उद्योगांपैकी एक आहे. अर्थव्यवस्थेच्या वृद्धी आणि माहिती आणि तंत्रज्ञानाच्या वेगवान विकासाकरिता या उपकरणांचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. सध्या विकसित होणाऱ्या नवीन क्षेत्रांमध्ये तसेच वीज, दळणवळण, ऊर्जेची उत्पादने, स्मार्ट सिटी, स्मार्ट सिग्नल, स्मार्ट विजेची दिवे, इत्यादी क्षेत्रांचा त्वरित विकास करण्याकरिता इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि सेन्सरचा मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. खरं तर आयटी आणि इलेक्ट्रॉनिक क्षेत्रांमध्ये भारताने एक ब्रँड तयार केले आहे. मागील आर्थिक वर्ष २०१९-२०मध्ये या क्षेत्राचा महसूल २०० अब्ज डॉलरपर्यंत पोहोचला आणि तो २०२५पर्यंत ३५० अब्ज डॉलर पेक्षाही जास्त होण्याचा अनुमान आहे. डिजिटल अर्थव्यवस्था २०२५पर्यंत एक ट्रिलियन डॉलरपर्यंत पोहोचण्याचे अनुमान आहे. भारतासाठी ही अभिमानाची बाब असली तरी त्याच्या सकारात्मक लाभापेक्षा नकारात्मक परिणामांचा विचार करणे तितकेच गरजेचे आहे. एका अध्ययनामध्ये असा निष्कर्ष निघाला की, व्यक्ती जागी असताना १६ तासांमध्ये सरासरी ५८ वेळा मोबाईल तपासतो. सर्वेक्षणावरून असेही स्पष्ट झाले आहे की, पाच पैकी दोन भारतीय दरवर्षी मोबाईल फोन बदलतात. या आकडेवारीवरून तंत्रज्ञान आपल्या जीवनामध्ये किती महत्त्वपूर्ण आहे हे स्पष्ट होते. तंत्रज्ञानाच्या अति वापरामुळे मानवाचे राहणीमान अधिक सोयीस्कर झाले असले तरी तंत्रज्ञानापासून होणारे दुष्परिणाम नाकारता येत नाही. (Downtoearth, २०२१).

इलेक्ट्रॉनिक बाजारामध्ये होत असलेल्या वेगवान प्रगतीमुळे आपल्याला नवीन आणि विविध वैशिष्ट्ये असणारी उपकरणे वापरायला मिळत आहेत. या वेगवान बदलांमुळे इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे आयुष्य कमी कमी होत चालले आहे. आज मनुष्य आपल्या दैनंदिन जीवनामध्ये विविध इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिकल उपकरणांचा उपयोग करायला लागला आहे ज्यांचे आयुष्य हे काही महिने किंवा काही वर्षातच

लेखक नागपूरस्थित राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठात अर्थशास्त्राचे सहाय्यक प्राध्यापक आहेत.
ईमेल - drsamitmahore@gmail.com

संपून जाते. किंबहुना त्यांचे आयुष्य संपण्याच्या आधीच आपण नवीन वस्तू खरेदी करून तिचा उपयोग करणे सुरू करतो.

तंत्रज्ञानामध्ये होणाऱ्या वेगवान बदलांमुळे आपल्या जवळ असलेले तंत्रज्ञान हे जुने होत जाते आणि बाजारामध्ये नवीन तंत्रज्ञानाने सुसज्ज अशा वस्तू येत असतात. आज आपल्या अवतीभवती अशा अनेक वस्तू आहेत ज्या नादुरुस्त झाल्यामुळे किंवा त्याऐवजी नवीन वस्तू खरेदी केल्यामुळे उपयोगात आणल्या जात नाहीत. बाजारामध्ये एखादी नवीन वस्तू दिसली की, आपण वापरत असलेली वस्तू ही जुनी झाल्याची प्रचीती येते आणि नवीन वस्तू खरेदी करण्याची ओढ प्रत्येकालाच लागते. ह्या वस्तू जरी टिकाऊ नसल्या तरी प्रत्येकाला हव्याहव्याशा वाटतात. त्याचबरोबर वेगाने होणाऱ्या तंत्रज्ञानातील आणि बाजारातील मोठ्या मागणीमुळे इलेक्ट्रॉनिक वस्तूंच्या किंमती झपाट्याने कमी होत आहेत. आपल्या घरातील नादुरुस्त वस्तू दुरुस्त करण्याकरिता येणाऱ्या खर्चाच्या किंमतीतच बाजारपेठेमध्ये नवीन वस्तू उपलब्ध होत आहेत. त्यांमुळे आपण ह्या वस्तू दुरुस्त करून घेण्यापेक्षा सरळ नवीन खरेदी करतो. आपल्या आसपास अशा नादुरुस्त आणि उपयोगात न येणाऱ्या इलेक्ट्रॉनिक वस्तूंचा साठा जमा वाढत जातो.

जमा झालेल्या इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिक वस्तूंच्या या कचऱ्यालाच ई-कचरा असे म्हणतात. इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिकल उपकरणांमध्ये विजेवर आणि बॅटरीवर चालणाऱ्या वस्तूंचा किंवा समभागांचा समावेश केला जातो. इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिकल वस्तूंचे आयुष्य संपल्यानंतर किंवा त्या नादुरुस्त झाल्यानंतर त्यांचे रूपांतर ई-कचऱ्यामध्ये होते. यामध्ये मौल्यवान आणि घातक सामग्री अशा दोन्हींचा समावेश असतो. इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिक उपकरणांमध्ये घरगुती आणि व्यवसायिक वापराच्या अशा सर्वच वस्तूंचा समावेश केला जातो ज्या विजेवर किंवा बॅटरीवर चालतात. या उपकरणांमध्ये मोबाईल फोन, टॅबलेट, लॅपटॉप, कॉम्प्युटर, टेलिव्हिजन, फ्रीज, इलेक्ट्रॉनिक घड्याळे, ट्रिमर, कॅलक्युलेटर्स, खेळणी, वॉशिंग मशीन, डिश वॉशर, स्वयंपाकघरातील इतर उपकरणे, राऊटर, चार्जर आणि संगीताची वाद्ये यासारख्या अनेक उपकरणांचा समावेश होतो.

**ई-कचरा एक आंतरराष्ट्रीय समस्या**

ई-कचरा हा सर्वात वेगाने वाढणारा अर्थव्यवस्थेतील एक घटक आहे. जागतिक स्तरावर केवळ १७ टक्केच ई-कचरा संकलित केला जातो आणि त्याचे पुनर्नविनीकरण केले जाते. यामध्ये कितीतरी मौल्यवान सामग्री नष्ट होते आणि पर्यावरणीय नुकसान होताना दिसून येत आहे. इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा माहिती तंत्रज्ञान आणि दूरसंचारमध्ये मोठ्या प्रमाणात उपयोग केला जातो. याकरिता जागतिक विकासामध्ये फार मोठ्या संधी उपलब्ध झाल्या आहेत. ही उपकरणे उच्च राहणीमानाची हमी देतात आणि आपल्या बऱ्याच गरजा पूर्ण करीत असतात. परंतु त्यांचे आयुष्य संपल्यानंतर आपल्या दैनंदिन वापरात असणाऱ्या ह्या वस्तू जसे मोबाइल फोन, लॅपटॉप, सेंसर, टीव्ही, वॉशिंग मशीन, स्पीकर, इयरफोन, एयर कंडीशनर, फ्रिज यासारख्या अनेक वस्तू, विशेषतः जेव्हा त्यांचे अपर्याप्त व्यवस्थापन केले जाते, त्यांच्यामध्ये असणाऱ्या हानीकारक पदार्थांमुळे मानवी आरोग्याला आणि आणि पर्यावरणाला फार मोठी हानी पोहोचवितात.

ई-कचरा हा सर्वात जास्त वेगाने वाढणाऱ्या घन कचऱ्याचा एक प्रकार आहे. नुकत्याच प्रकाशित झालेल्या जागतिक ई-कचरा परीक्षण अहवाल २०२०नुसार, २०१९मध्ये जगात ५३.६ मेट्रिक टन ई-कचरा निर्माण झाला ज्याचा दर जागतिक स्तरावर ७.३ किलोग्रॅम प्रति व्यक्ती होता. ई-कचऱ्यामध्ये ह्याच दराने वाढ झाली तर २०३०पर्यंत एकूण ७५ मिलियन मेट्रिक टन म्हणजेच ९ किलोग्रॅम प्रति व्यक्ती

ई-कचऱ्याची निर्मिती होईल असे अनुमान आहे. सध्या जागतिक स्तरावर २ मिलियन मेट्रिक टन प्रतिवर्ष ई-कचऱ्याची निर्मिती होत आहे. २०१४पासून ई-कचऱ्यांमध्ये २१ टक्क्यांची वाढ झाली आहे. या वाढीचा संबंध इलेक्ट्रिक आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांचा वापर करणाऱ्यांची वाढणारी संख्या, स्थिर तांत्रिक विकास तसेच टप्प्याटप्प्याने कमी होणारे जुने तंत्रज्ञान यांच्याशी आहे. यामध्ये लहान जीवन चक्र उत्पाद आणि वस्तूंची रचना जी दुरुस्ती आणि पुनर्वापराचे समर्थन करीत नाही याचाही समावेश होतो. जागतिक स्तरावर फक्त ९.३ मिलियन मेट्रिक टन किंवा १७ टक्के ई-कचऱ्याचे संकलन आणि पुनर्नविनीकरण पर्यावरणाला अनुरूप पद्धतीने केले जाते. म्हणजेच ८३ टक्के ई-कचऱ्याचे पुनर्नविनीकरण आणि विल्हेवाट ही पर्यावरणाला अनुरूप पद्धतीने केली जात नाही. त्याचा उपयोग जमीन भरणे आणि इतर कचऱ्यात मिश्रित करण्याकरिता केला जातो. परिणामी, बहुमूल्य धातू आणि पृथ्वीवरील दुर्मिळ घटक अशी मौल्यवान संसाधने व्यर्थ जात आहेत. त्याचबरोबर या कचऱ्यापासून मानवी आरोग्याला आणि पर्यावरणाला हानिकारक घटक निर्माण होत आहेत.

जर आपण पण जागतिक स्तरावर सर्वात जास्त ई-कचरा निर्माण करणाऱ्या देशांचा विचार केला तर पहिल्या दहा देशांमध्ये अनुक्रमे चीन (१०१२.९ मि. मे. टन), अमेरिका (६९१.८ मि. मे. टन), भारत (३२३० मि. मे. टन), जपान (२५६९ मि. मे. टन), ब्राझील (२१४३ मि. मे. टन), रशिया (१६३१ मि. मे. टन), इंडोनेशिया (१६१८ मि. मे. टन), जर्मनी (१६०७ मि. मे. टन), इंग्लंड (१५९८ मि. मे. टन) आणि फ्रान्स (१३६२ मि. मे. टन) या देशांचा क्रमांक लागतो. जागतिक पातळीवर प्रतिव्यक्ती सर्वात जास्त ई-कचरा निर्माण करणाऱ्या देशांमध्ये इंग्लंड (२३.९ किलो), जपान (२०.४ किलो) आणि कॅनडा (२०.२ किलो) या देशांचा समावेश होतो. भारतामध्ये प्रतिव्यक्ती २.४ किलो ग्रॅम ई-कचरा तयार होत आहे. (Forti, २०२०)

### ई-कचऱ्याचे वर्गीकरण

प्रत्येक प्रकारच्या ई-कचऱ्याला विशिष्ट आकार असतो आणि त्यामध्ये दुर्मिळ घटक, मौल्यवान साधन सामग्री असते. (Bristol, २०१५) त्यामुळे त्यांचे संकलन, उपचार, पुनर्नवीनीकरण, आणि त्यांची विल्हेवाट ही पर्यावरणपूरक पद्धतीने करणे आवश्यक असते. ई-कचऱ्यामध्ये मोठ्या प्रमाणात नादुरुस्त उपकरणांचा समावेश होत असल्यामुळे त्याचे वर्गीकरण करतांना यामध्ये उत्पादनाच्या प्रकार किंवा आकार याचा विचार केला जातो. युरोपियन संघाच्या इलेक्ट्रिकल आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांच्या ई-कचऱ्याकरिता दिलेले निर्देश आणि ई-कचऱ्याच्या आकडेवारी मानक दिशानिर्देशमध्ये दिल्याप्रमाणे उपचार केंद्रित वर्गीकरणानुसार ई-कचऱ्याचे वर्गीकरण पुढील सहा प्रकारांमध्ये केले जाते.

१. तापमान विनिमय उपकरणे - यामध्ये फ्रीज, उद्योगांमध्ये वापरात येणारे मोठे शीत यंत्रे, एअर कंडिशन आणि उष्णता पंप यांचा समावेश होतो.

२. स्क्रीन आणि मॉनिटर्स - यामध्ये एलसीडी डिस्प्ले, एलईडी, मॉनिटर्स, लॅपटॉप, टॅबलेट यांचा समावेश केला जातो.

३. दिवे- यामध्ये इन्टेन्सिटी डिस्चार्ज, फ्लोरोसेंट दिवे, लहान व मोठे ट्यूबलाइट यांचा समावेश केला जातो.

४. मोठी उपकरणे- यामध्ये वॉशिंग मशीन, डिश वॉशर, ओव्हन, केंद्रीय उष्णता पद्धती, मोठे प्रिंटर्स आणि फोटो होल्याटिक पॅनल यांचा समावेश होतो.

५. लहान उपकरणे- या प्रकारामध्ये घरगुती वापरात येणारे मायक्रोवेव्ह, ग्रील आणि टोस्टर, वैयक्तिक सेवा उत्पादने, स्पीकर्स, कॅमेरे, ऑडिओ सेट, हेडफोन, खेळणी, घरगुती साधने, वैद्यकीय आणि देखरेख प्रणाली

यांचा समावेश होतो.

६. माहिती तंत्रज्ञान आणि दूरसंचार संबंधित लहान उपकरणे- या प्रकारांमध्ये संगणक, प्रिंटर, मोबाईल फोन, कॉर्डलेस फोन, कीबोर्ड, माऊस, राउटर यासारख्या उपकरणांचा समावेश होतो.

**ई-कचऱ्याचे मापन**

ई-कचऱ्याचे परिमाण आणि प्रवाह मोजणे महत्त्वपूर्ण व आव्हानात्मक कार्य आहे. कोणत्याही धोरणाची यशस्वी अंमलबजावणी ही अधिकृत समंकावर अवलंबून असेल तरच शक्य होते. त्याचप्रमाणे ई-कचरा निर्मिती, प्रवाह, आणि नियंत्रण किंवा पुनर्नविनीकरणाचे माप उपयोगात आणले तरच ई-कचऱ्याचे परीक्षण आणि नियंत्रण शक्य होऊ शकते. मोजमापाच्या योग्य साधनांचा अभाव असेल तर स्थानिक, प्रादेशिक, राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय पातळीवर ई-कचऱ्यासंबंधित कार्ययोजना अप्रभावी ठरेल. समंकाचे योग्य मापन जागतिक स्तरावर ई-कचऱ्याच्या माहितीची निर्मिती आणि नियंत्रण करण्यास मदत होईल. जागतिक स्तरावर ई-कचरा व्यवस्थापनाचे परीक्षण हे सतत विकास ध्येयातील १२ वे लक्ष्य - शाश्वत उपभोग आणि उत्पादनांतर्गत केले जाते. आंतरराष्ट्रीय दूरसंचार संघाद्वारे निर्धारित २०३० अजेंड्याप्रमाणे जागतिक स्तरावर कचऱ्याच्या पुनर्नविनीकरणाचा दर ३० टक्क्यांपर्यंत नेण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे. त्याचबरोबर ई-कचरा व्यवस्थापनाकरिता आवश्यक कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या देशांची संख्या ही २०२३मध्ये ५० टक्क्यांपर्यंत नेण्याचे लक्ष्य साधण्यात आले आहे. ई-कचऱ्याच्या सर्वात महत्त्वपूर्ण गतिशीलतेचे मापन करण्याच्या दृष्टीने सतत विकास ध्येये आणि आंतरराष्ट्रीय मार्गदर्शकानुसार चार निर्देशक ठरविण्यात आले आहे. ते असे :

१ : बाजारातील उपलब्ध इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिक उपकरणांचे मापन प्रतिव्यक्ती प्रतिकिलो या दराने केले जाते. यावरून राष्ट्रीय ई-वस्तू बाजाराच्या आकाराचे आकलन केले जाते.

२ : निर्मित ई-कचऱ्याचे मापन प्रतिव्यक्ती प्रतिकिलो या दराने केले जाते. यावरून एका राष्ट्राने निर्मित ई-कचऱ्याचा आकार निर्देशित केला जातो.

३ : पर्यावरणाला अनुरूप पद्धतीने व्यवस्थापित केलेल्या ई-कचऱ्यामध्ये औपचारिक संकलन प्रणालीद्वारे किती ई-कचरा संकलित केला गेला, ते निर्देशित केले जाते.

४ : ई-कचरा संकलन दर हा (एकूण पुनर्नविनीकृत केलेला ई-कचरा / एकूण निर्मित ई-कचरा द १००) यावरून काढला जातो. हे निर्देशक औपचारिक संकलन प्रणालीची कामगिरी निर्देशित करतात. (Forti V, २०१८)

**ई-कचरा आणि भारत**

भारत जागतिक स्तरावर अधिकृतपणे दरवर्षी ३.२३ मिलियन मेट्रिक टन ई-कचरा निर्माण करणारा चीन आणि अमेरिकेनंतरचा तिसऱ्या क्रमांकाचा देश बनला आहे. आज भारतामध्ये ९५ टक्क्यांपेक्षा जास्त ई-कचरा हा अनौपचारिक क्षेत्राद्वारे हाताळला जातो ज्यामुळे या समस्येत अधिक भर पडते. वित्तीय वर्ष २०१८ ते २०२० दरम्यान भारताची ई-कचरा निर्मिती जवळ जवळ ४३ टक्क्यांनी वाढली आहे. केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालानुसार वित्तीय वर्ष २०१९-२०मध्ये भारतात २१ प्रकारच्या इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिकल उपकरणांचा समावेश असलेला १०,१४,९६१.२ टन ई-कचरा निर्माण झाला आहे. कोविड-१९ महामारीमुळे इलेक्ट्रॉनिक उपकरणांसाठी असलेल्या मागणीत वाढ झाल्यामुळे नजीकच्या काळात ई-कचऱ्यात अधिक भर पडण्याचे चित्र दिसत आहे. आज भारतात निर्माण होणाऱ्या एकूण ई-कचऱ्यामध्ये ७० टक्के प्रमाण हे संगणक उपकरणांचे असून, मोबाइल फोनचे प्रमाण १२ टक्के, विजेच्या उपकरणांचे प्रमाण ८ टक्के तर वैद्यकीय उपकरणांचे प्रमाण ७ टक्के आहे.

ई-कचरा निर्मितीमध्ये शहरी भागाचे सर्वात जास्त योगदान आहे यात काहीच शंका नाही परंतु मोबाईल क्रांती मुळे ग्रामीण भागही आता मागे राहिलेला नाही. भारतामध्ये ई-कचऱ्याचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी बहुआयामी दृष्टिकोन असणे आवश्यक आहे. विजेची उपकरणे निर्माण करण्याकरिता ई-कचरा नियंत्रित नवीन प्रणालीचा उपयोग होत असला तरी इतर उपकरणेही योग्य पद्धतींने व नियंत्रित नियमांच्या आधारे निर्मित होणे आवश्यक आहे. त्याचबरोबर औपचारिक पद्धतीने गोळा करण्याकरिता येणारा व्यय कमी करून या क्षेत्रातील लोकांना प्रोत्साहित करणे गरजेचे आहे. देशात होणाऱ्या बेकायदेशीर आयातीवर आणि अतिरिक्त उत्पादित मालाचे योग्य व्यवस्थापन करणे ही तितकेच महत्त्वाचे आहे.

२०११पासून ई-कचऱ्याची योग्य अंमलबजावणी आणि नियंत्रण करण्यासाठी आवश्यक कायदा लागू करणारा भारत हा दक्षिण आशियातील एकमात्र देश आहे. ई-कचरा (व्यवस्थापन आणि हाताळणी) नियम हे केवळ पर्यावरणाला अनुकूल मार्गाने ई-कचऱ्याची हाताळणी करण्यापर्यंतच मर्यादित नसून यामध्ये ई-कचऱ्याची वाहतूक, भांडारण आणि पुनर्नविनीकरण यांचाही समावेश असणे तितकेच महत्त्वाचे आहे.

### ई-कचरा व्यवस्थापन

कचरा कुठलाही असो ती एक गंभीर समस्या आहे. ई-कचरा हा वाढत असल्याने त्याचे दूरगामी परिणाम समाजावर आणि पर्यावरणावर होताना दिसून येतात. त्यामुळे ई-कचऱ्याचे व्यवस्थापन करणे महत्त्वाचे आहे. आजच्या तंत्रज्ञान युगात इलेक्ट्रॉनिक उपकरणे आणि संगणकाचा अति वापर हा आपल्या दैनंदिन वापराचा एक भाग असल्यामुळे त्याला आपण नाकारू शकत नाही. बदलत्या तंत्रज्ञानामुळे आणि वाढत्या मागणीमुळे इलेक्ट्रॉनिक उपकरणांची संख्या वाढते, परिणामी ई-कचरा तयार होत जातो. वाढणाऱ्या ई-कचऱ्याचे व्यवस्थापन करणे फार गरजेचे आहे. इलेक्ट्रॉनिक उपकरणांमध्ये कॅडमियम, क्रोमियम, निकेल, बेरिलियम, पारा, अँटिमोनी, तांबे, लोह, निकेल, जस्त, चांदी, सोने, यासारखे अनेक मौल्यवान धातू असतात. ई-कचरा संकलनाचा दर भारतामध्ये जास्त आहे. हे मौल्यवान धातू मानवी आरोग्याला आणि पर्यावरणाला हानिकारक ठरू शकतात. त्यामुळे त्यांचे योग्य व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.

### भारतातील ई-कचरा व्यवस्थापन कायदे

◆ भारत सरकारने विस्तारित उत्पादक जबाबदारी (EPR)च्या आधारावर २०११ साली ई-कचरा व्यवस्थापन करण्यासंबंधी पहिला कायदा आणला. या कायद्यानुसार उपादनाच्या कालमर्यादेच्या शेवटी उत्पादकांवर वस्तूच्या व्यवस्थापनाविषयी भर देण्यात आला.

◆ त्यानंतर २०१६मध्ये ई-कचरा व्यवस्थापन विनिमय २०१६ लागू झाला. या नियमात प्रत्येक निर्माता, उत्पादक, ग्राहक, विक्रेता, कचरा संकलन करणारा त्याचबरोबर त्यावर उपचार करणारा आणि पुनर्वापर करणारा या सर्वांचा समावेश करण्यात आहे. हा नियम २१ पेक्षा जास्त उत्पादनासाठी लागू करण्यात आला असून यामध्ये अनौपचारिक क्षेत्रातल्या श्रमिकांना ई-कचरा हाताळणे व व्यवस्थापनासाठी विशेष प्रशिक्षण दिले जाते.

◆ ई-कचरा संकलनासाठीचे नवीन निर्धारित लक्ष १ ऑक्टोबर २०१७पासून प्रभावी करण्यात आले आहे. विविध टप्प्यांमध्ये ई-कचऱ्याचे संकलन लक्ष सन २०१७-१८ दरम्यान उत्पन्न केल्या गेलेल्या कचऱ्याच्या वजनाच्या १० टक्के असेल, जी २०२३ सालापर्यंत वार्षिक दहा टक्केच्या दराने वाढत जाईल. सन २०२३नंतर हे लक्ष एकूण उत्पन्न झालेल्या ई-कचऱ्याच्या ७० टक्के होण्याचा अंदाज आहे.

◆ विस्तारित उत्पादक जबाबदारीला आणखी

मजबुती देण्याकरिता उत्पादक जबाबदारी संघटना नावाची एक नवीन व्यवस्था निर्माण करण्याची शिफारस करण्यात आली आहे ज्यामध्ये EPR ही एक व्यावसायिक संस्था आहे जी ई-कचऱ्याचे पर्यावरणास अनुकूल व्यवस्थापन निश्चित करण्यासाठी निर्माण झालेल्या कचराची संकलन आणि त्याच्या विल्हेवाटची जबाबदारी निश्चित करण्यासाठी निर्मात्यांनी द्वारे एकत्रितपणे किंवा वैयक्तिक रित्या अर्थपूर्ण करण्यास अधिकृत असेल.

◆ नियमानुसार उत्पादकांनाही सुनिश्चित करण्याचे आदेश येतात की, त्यांच्या उत्पादनांमध्ये शिसे, पारा कॅडमियम, एक्सा, क्रोमियम, मिनी ट्रेन, पॉलिब्रोमिनीटेड, आणि पॉलिब्रोमिनेटेड डिफेनिल एथर्स यांचे प्रमाण कमाल प्रमाणाबाहेर वापरले जाऊ नये. शिवाय केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळ (सीपीसीबी) बाजारामधून इलेक्ट्रिक आणि इलेक्ट्रॉनिक उपकरणांचे यादृच्छिक नमुने घेऊन प्रमाण तपासतात.

केंद्रीय प्रदूषण नियंत्रण मंडळानुसार, भारतात ५१ नोंदणीकृत उत्पादक जबाबदारी संघटना आणि १७०३ उत्पादक अधिकृत विस्तारित उत्पादक जबाबदारी संस्था आहेत. भारतात ४०० अधिकृत डिसमेंटलर्स आणि १०,६८,५४२.७ मेट्रिक टन प्रति वर्षी क्षमता असलेले रिसायकलर्स आहेत. तरीही अनौपचारिक क्षेत्रातील काही उत्पादक जबाबदारी संघटनांमुळे ई-कचऱ्याचे प्रमाण वाढत जात आहे. त्यामुळे लक्ष्य पूर्ण करण्यासाठी ते ई-कचऱ्याची विल्हेवाट लावण्यास मदत करीत असले तरी अनेक उत्पादक कागदोपत्री त्यांच्या नावावर दाखविण्याकरिता मोठ्या प्रमाणात असंघटित क्षेत्रातून ई-कचरा चिन्हांकित किंमतीला खरेदी करतात. यामुळे देशात निर्माण होणाऱ्या ई-कचऱ्याची आणि त्यांच्या व्यवस्थापनाची योग्य आकडेवारी मिळत नाही. (Laha, २०१२)

**ई-कचरा की, संसाधन**

आपल्या अवतीभोवती मोठ्या प्रमाणात वाढणारा ई-कचरा हानिकारक असून याचे वाईट परिणाम मानवावर आणि पर्यावरणावर होताना दिसत आहेत. परंतु आपल्या राहणीमानाचा आणि सुखसोयींचा विचार करता डिजिटल क्रांती काही थांबणार नाही. त्यामुळे कचरा निर्माण होणारच. परंतु या कचऱ्यापासून होणारे दुष्परिणाम आपण काही प्रमाणात कमी करू शकतो. त्याचबरोबर पृथ्वीवर उपलब्ध दुर्मिळ घटक जे इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिक वस्तू तयार करण्यामध्ये वापरले जातात, त्यांचा पुनर्वापर करून पर्यावरण समतोल राखण्याचा काही अंशी प्रयत्न करू शकतो. जागतिक ई-कचरा परिक्षण अहवाल २०१९नुसार १७.४ टक्के ई-कचऱ्याचे संकलन करून पुनर्नविनीकरण करण्यात आले. म्हणजेच ८२.६ टक्के कचऱ्यामध्ये समाविष्ट असलेले सोने, चांदी, तांबे, लोह, गॅलियम, टेण्टलम, इंडियुम, ऑट्रियम व यासारखे अनेक मौल्यवान आणि दुर्मिळ धातू हे एक तर जमिनीमध्ये पुरण्यात येतात किंवा त्यांना जलसमाधी देण्यात येते. यामुळे मौल्यवान धातू नष्ट होऊन पर्यावरणावरील दबाव वाढत आहे. २०१९मध्ये जगात निर्माण झालेल्या एकूण ई-कचऱ्याचे पुनर्नविनीकरण केले असते तर त्याची एकूण किंमत ४.३ लाख कोटी रु. एवढी असती, जी जगातील अनेक देशांच्या जीडीपीहून जास्त आहे. ई-कचऱ्याचे व्यवस्थित संकलन आणि पुनर्नविनीकरण केल्यास ई-कचऱ्यामध्ये समाविष्ट असलेल्या मौल्यवान धातूंचा पुनरुपयोग होऊन पर्यावरणावरील दबाव कमी होऊन चक्रीय अर्थव्यवस्थेला प्रोत्साहन दिले जाते. (weeforum, २०२१). उदाहरणार्थ, जवळ जवळ १० लाख मोबाईल फोनमध्ये २४ किलो सोने, १६,००० किलो तांबे, ३५० किलो चांदी आणि १४ किलो पैलेडियम असते, जे वस्तूंचे पुनर्नविनीकरण करून मोबाईल फोन बनविण्याकरिता पुन्हा उपयोगात आणले जाऊ शकते. यामुळे पर्यावरणावरील ताण कमी होण्यास मदत होते. याचे आणखी एक महत्त्वपूर्ण उदाहरण म्हणजे, नुकत्याच पार पडलेल्या टोकियो २०२० ऑलिम्पिकमध्ये

स्पर्धकांना देण्यात आलेली सर्व पदके ही पुनर्नविनीकरण केलेल्या कचऱ्यापासून तयार करण्यात आली होती. या ऑलिम्पिकमध्ये विजेत्या स्पर्धकांना देण्यात आलेली ५,००० पदके ही लहान मोठ्या ७८,९८५ टन इलेक्ट्रॉनिक कचऱ्यापासून बनविण्यात आली होती. पदकांना लागलेला ई-कचरा जपानच्या विविध भागांमधून स्थानिक संस्थांद्वारे गोळा करण्यात आला होता. जपानने या संपूर्ण पुनर्नविनीकरणाच्या प्रक्रियेमधून ७० पौंड सोने, ७,७०० पौंड चांदी आणि ४,८५० पौंड तांबे गोळा केले होते. (Firstpost, २०२१)

### ई-कचरा आणि रोजगाराच्या संधी

इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिकल वस्तू या आपल्या दैनंदिन जीवनाशी संबंधित असल्यामुळे त्यांचा वापर कमी करणे किंवा बंद करणे शक्य नाही. त्यामुळे ई-कचरा निर्माण होणारच. परंतु कचऱ्याचे दुष्परिणाम आणि त्यामध्ये समाविष्ट असलेल्या दुर्मिळ धातू आणि मौल्यवान घटकांचा विचार करता त्यांचे पुनर्नविनीकरण केले जाऊ शकते. निर्माण होणारा कचरा व्यवस्थितपणे संकलित करून पर्यावरण मानकाच्या आधारे पुनर्नविनीकरण केले जाऊ शकते. पुनर्नविनीकरण केल्यामुळे मौल्यवान धातू आणि दुर्मिळ घटकांचा पुन्हा वापर होईल आणि या प्रक्रियेमुळे पर्यावरणावरील दबाव कमी होऊन मोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होऊ शकतो. यामध्ये वाढत्या ई-कचऱ्याचे संकलन करणे, मौल्यवान धातू, प्लास्टिक, काच आणि इतर घटक वेगवेगळे करणे आणि त्यानंतर त्यावर प्रक्रिया करणे यासारखे कार्य पूर्ण करावे लागते. याकरिता मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊ शकतात. जागतिक स्तरावर या बाजाराचा आकार ४९.८ अब्ज डॉलर इतका होता जो २०२८पर्यंत १४.३ चक्रवाढ वार्षिक वृद्धीदराने १४३.८ अब्ज डॉलर पोहचण्याचा अंदाज आहे. येणाऱ्या काळात या क्षेत्रामध्ये संधी उपलब्ध होणार आहेत: भारतासारख्या अनेक विकसनशील देशांमध्ये ई-कचरा संकलनाची जनजागृती होणे आवश्यक आहे. त्यामुळे निर्माण होणाऱ्या संपूर्ण ई-कचऱ्याचे संकलन आणि व्यवस्थापन करणे शक्य होईल.

### ई-कचऱ्याचे मानवावर व इतर जैविक घटकांवर होणारे परिणाम

ई-कचरा हा सतत वाढत जात असल्याने विविध घटकांवर त्याचे नकारात्मक प्रभाव होताना दिसून येतात. प्रत्येक व्यक्ती रोजच्या वापरात अनेक इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिक उपकरणांचा उपयोग करीत असतो. अशा वस्तूंचे आयुष्य कमी असल्याने आणि ह्या वस्तू सहजासहजी नष्ट होत नसल्याने त्या आपल्या अवती भोवती पडून असतात व त्याचे दूरगामी वाईट परिणाम आपल्या जीवनावर आणि पर्यावरणावर होतात. (Singh, २०१६)

इलेक्ट्रॉनिक आणि इलेक्ट्रिक वस्तू सहज नष्ट होत नसल्याने अनेकांकडून अशा वस्तूंना जाळण्याचा प्रयत्न केला जातो. परंतु अशा वस्तू जाळल्याने नष्ट तर होत नाही पण वायू प्रदूषण नक्कीच होते. अनेकदा ई-कचरा हा जमिनीमध्ये पुरण्यात येतो. यामध्ये अनेक धातू समाविष्ट असल्याने ते जमिनीत तसेच राहतात. यावर विशिष्ट प्रक्रिया न केल्या गेल्यामुळे ते जमिनीतील विविध जलस्रोतांमध्ये मिसळल्याने रासायनिक प्रक्रिया घडून येते. समाजातील बरीचशी लोकसंख्या ही जमिनीतील जलस्रोतांवर अवलंबून असते. या प्रदूषित पाण्यामुळे त्यांना अनेक आजार होत असतात.

ई-कचरा हा जमिनीत नष्ट होत नसल्याने त्यांच्यामध्ये असलेल्या धातूंमुळे आणि रासायनिक घटकांमुळे जमिनीची उत्पादकता कमी होते व पर्यावरणाचा नाश होतो. या सर्व प्रदूषित रासायनिक प्रक्रियेचा संबंध मनुष्यासोबतच इतर जैविक घटकांवर होत असतो. याचा परिणाम म्हणजेच मनुष्याला होणारे अनेक आजार आहेत. यामध्ये हृदयरोग, मेंदूशी संबंधित आजार,

यकृत, मूत्रपिंड, यासारख्या अनेक आजारांचा समावेश होतो.

## निष्कर्ष

आज संपूर्ण जग हे पर्यावरण आणि तापमान वाढीच्या समस्यांनी ग्रस्त आहे. त्यामध्ये वाढत जाणारा ई कचरा आणखी भर टाकतो. ई-कचऱ्याचे व्यवस्थित संकलन करून पुनर्नविनीकरण करण्यात आले तर मौल्यवान धातूंसोबत पृथ्वीवरील दुर्मिळ घटकांचीही बचत होईल. या प्रक्रियेमुळे पर्यावरणावर वाढणारा दबाव तर कमी होईलच त्याचबरोबर कार्बन उत्सर्जन कमी करण्यास फार मोठी मदत होईल. बेल्जियममधील एका पर्यावरण सल्लागार कंपनीने वर्ल्डलूपच्या अध्ययनामध्ये असा निष्कर्ष काढला की, एक टन ई-कचऱ्याचे पुनर्नविनीकरण केल्यास १.५ ते २ टन कार्बन उत्सर्जन कमी केल्या जाते. तसेच २०२१मध्ये निर्माण होणाऱ्या एकूण ई-कचऱ्याचे पुनर्नविनीकरण केल्यास जवळ जवळ ११.४ कोटी टन कार्बन उत्सर्जन थांबविल्या जाऊ शकते. प्रत्येक देशाने कायद्याने ई-कचरा कमी करणे आणि निर्माण होत असलेल्या ई-कचऱ्याचे व्यवस्थित पुनर्नविनीकरण करणे महत्त्वाचे आहे. यामुळे पर्यावरण आणि मानवी राहणीमानात समतोल साधणे शक्य होईल.

●

## संदर्भ


1. Firstpost (2021), "Tokyo Olympics 2020 medals made from recycled electronic devices like mobile phones', url- https://www.firstpost.com/sports/tokyo-olympics-2020-medals-made-from-recycled-electronic-devices-like-mobile-phones-9878521.html
2. TOI (2021), "Tokyo 2020: Olympic medals made of old electronic devices' url- https://timesofindia.indiatimes.com/life-style/spotlight/tokyo-2020-olympic-medals-made-of-old-electronic-devices/articleshow/84884339.cms
3. Downtoearth, (2021), Dealing with the Discarded e-waste management in India,' URL https://www.downtoearth.org.in/blog/pollution/dealing-with-the-discarded-e-waste-management-in-india-78667
4. Firstpost, (2021), Tokyo Olympics- 2020 medals made from recycled electronic devices, url (https://www.firstpost.com/sports/tokyo-olympics-2020-medals-made-from-recycled-electronic-devices-like-mobile-phones-9878521.html)
5. weeforum, Consumer is the key to Circular Economy, 30 September 2021. Online. -vailable: https://weee-forum.org/iewd-about/.
6. L. M. L. Bristol, Characterization and recovery of rare earth elements from electronic scrap, Norwegian University of Science and Technology, 2015.
7. United Nations, Goal 12 Responsible Consumption and Production, August 2021. Online. Available: https://uneplive.unep.org/indicator/index/12§5§1.
8. B. C. P. K. R. Forti V., E-Waste Statistics: Guidelines on Classifications, reporting and indicators., in E-Waste Statistics: Guidelines on Classifications, reporting and indicators., Bonn, Germany, Global E-waste Statistics Partnership, 2018.
9. Pooja Singh, Shanu Thomas, E-waste management and Environment Protection: A Critical legal Analysis, Bharti law Review, pp. 27-35, 2016.
10. V. B. C. P. K. R. B. G. Forti, The Global E-waste Monitor 2020: Quantities, Flows and the Circular Economy Potential, Tokyo: United Nations University (UNU)/ United Nations Institute for Training and Research (UNITAR) - co hosted SCYCLE Programme, International Telecommunication Union (ITU) International Solid Waste Association (ISWA), Bonn/ Geneva / Rotterdam, 2020.
11. Laha et. al., E-waste recycling: Bridging the formal-informal divide, in Environmental Scenario in India: Successes and Predicaments, New York, Routledge, 2012.


परिवर्तनाचा वाटसरू

'परिवर्तनाचा वाटसरू'ची वर्गणी भरूनही काही वर्गणीदारांना अंक मिळत नाहीत, असे आमच्या निदर्शनास आले आहे. तसेच काही वर्गणीदारांना त्यांच्या जिल्हा - शहर - पिनकोड प्रभागातील सर्व वर्गणीदारांचे अंक एकगठ्ठा मिळत आहेत. सदर बाबीसाठी आम्ही पोस्टाकडे तक्रार करत आहोत. आपणही पोस्टात तक्रार करावी, ही विनंती.

**- सहव्यवस्थापक**

# जैविक सलोख्यासाठी

(भाग २रा)

भारत पाटणकर

महाराष्ट्राच्या या उदाहरणाबरोबरच तामिळनाडू मधली याच प्रकारची उदाहरणे घेता येतील. भारतातल्या सिंधू संस्कृती पाठोपाठ विकसित झालेल्या द्रविड संस्कृतीच्या विकासाचा भाग म्हणून पाटबंधारे, तलाव या मार्गांनी शेतीला पाणीपुरवठा करण्याचे नियोजन विकसित झालेले दिसते. इ.स. पूर्व १५० ते इ. स. २०० या काळामधल्या, 'संगम साहित्य' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या लिखित साहित्यात याचे पुरावे सापडतात. नद्यांवर बंधारे बांधून पाटाने केलेला पाणीपुरवठा आणि तलावांची पाणी व्यवस्था अशा दोन पद्धती यामध्ये दिसतात.

कावेरी, गोदावरी, तांब्रपाणी आणि तुंगभद्रा अशा अनेक नद्यांच्या आणि उपनद्यांच्या जाळ्यात, नद्यांवर बंधारे बांधून अडवलेले पाणी पाटांनी शेतीला देण्याची, फार मोठी व्यवस्था होती. प्रवाह मोठा आहे की, लहान आहे यावर ठरणाऱ्या लाभक्षेत्राचे प्रमाण पाच एकरापासून एक हजार एकरांपर्यंत होते. कावेरी नदीपासून सुरू होणारे कालवे पन्नास किलोमीटरपर्यंत लांब गेलेले होते. असे कालवे शंभरावर खेड्यांना शेतीसाठी पाणीपुरवठा करीत होते. प्राचीन अश्मयुगातील 'अडिचन्नूवर' या ठिकाणी, तांब्रपाणी नदीच्या काठी या इतिहासाची साक्ष मिळते. कन्याकुमारी जिल्ह्यातील बंधारे (ॲनिकट) किमान एक हजार वर्षांपूर्वीचे आहेत असे म्हटले जाते. दक्षिण आरकॉट जिल्ह्यात अशाप्रकारे हजारो एकर जमिनीला पाणीपुरवठा केला जात होता. १९०६मध्ये या जिल्ह्यातील पिकाऊ जमिनीपैकी ३२ टक्के जमीन सिंचनाची सोय असलेले होती. ब्रिटिश पाटबंधारे विभागाने केलेल्या पाहणीनुसार तंजावर भागातील जमीन नापीक असूनही तिथे चांगल्या उत्पादकतेची परिस्थिती फक्त सिंचनाच्या सोयी मुळेच निर्माण झाली होती. 'एरी' म्हणजे तलाव बांधून शेतीला पाणीपुरवठा करण्याची व्यवस्था सुद्धा तामिळनाडूमध्ये जुन्या काळातच मोठ्या प्रमाणात होती असे आढळते. या तलावांच्या आणि एकूण पाणी पुरवठा व्यवस्थेच्या देखभालीसाठी एकूण उत्पन्नाच्या ४-५ टक्के भाग बाजूला काढला जात असे. देखभाल आणि नियोजन करण्याची जबाबदारी ज्या लोकांच्यावर होती त्यांना सारा-मुक्त जमिनी दिल्या जात असत.

ब्रिटिश सत्ता प्रस्थापित झाल्यानंतर त्यांनी जमीनविषयक कायद्यात बदल केले. सारा जमा करण्याची नवीन पद्धत प्रस्थापित केली. पाटबंधारे - तलाव व्यवस्थांच्या विकेंद्रित व्यवस्थेसाठी प्रस्थापित झालेल्या पद्धती मोडल्या. आणि याच बदलांच्या परिणामी ही व्यापक सिंचन व्यवस्था कोलमडायला सुरुवात झाली.

लेखक कासेगाव जि. सांगली येथे राहात असून धरणग्रस्त तसेच डाव्या चळवळीतील ज्येष्ठ कार्यकर्ते - लेखक आहेत.
ईमेल- krantivir@gmail.com

तामिळनाडूमध्ये पाणीपुरवठा व्यवस्थेचे नियोजन स्थानिक जनतेच्या हातात होते. पण ही स्थानिक जनता जातिव्यवस्थेच्या उतरंडीत विभागली गेली होती. जमीन असणारे आणि जमीन नसणारे असा भेद तर होताच. पाणी पुरवठा व्यवस्थेचे नियोजन स्थानिक पातळीवर करणाऱ्या संस्थात्मक व्यवस्थेत सुद्धा त्या सामाजिक-आर्थिक रचनेचे प्रतिबिंब पडलेले होते. या व्यवस्थेचे दोन स्तर होते. एक स्तर प्रामुख्याने मुकादमीचा किंवा आवश्यक कामांची अंमलबजावणी करून घेणाऱ्यांचा होता. दुसरा स्तर शारीरिक कष्टाचे काम करणारा होता.

पहिल्या स्तरातील अधिकारी व्यक्ती 'नट्टमईकर' आणि 'कवाईमनियम' अशा नावाने संबोधल्या जात होत्या. या वरच्या जातीमधील किंवा मोठ्या शेतमालकांपैकी असत. शारीरिक श्रमाचे काम करणाऱ्या व्यक्तींना 'निरकट्टी' असे संबोधले जात असे. यांची निवड सर्वसाधारणपणे दलित समाजातून होत असे. वेगवेगळ्या कुटुंबातून फेराफेराने होत असे. या मजुरांना ५ ते १५ किलो धान्य प्रत्येक एकरामागे, प्रत्येक हंगामात दिले जात असे. सर्वसाधारणपणे एकरामागे एक व्यक्ती हे काम करण्यासाठी आली पाहिजे असा नियम होता. जर असे झाले नाही तर त्या पाळकऱ्याने कुटुंबाबाहेरील कुणाला तरी मजुरी देऊन बदली म्हणून पाठवावे लागत असे. यापैकी काहीच झाले नाही तर त्या पाळकरी शेतकऱ्याला दंड केला जात असे. ही व्यवस्था सरकारने ताब्यात घेतल्यानंतर सुद्धा 'निरकट्टी' हे दलितांमधून निवडले जात. पण १९८०नंतर ही कामाची जागा सर्व जातींना खुली केली गेली आहे. आणि सरासरीने ४०० रुपयांच्या दरम्यान मासिक पगार हे काम करणाऱ्यांना दिला जात आहे.

या सर्व पाणीपुरवठा योजना उभ्या करण्यात वेगवेगळ्या राजेशाह्यांचा मोठा वाटा होता. पांडय, चोळा अशा राजांपासून ते नंतरच्या नबावापर्यंत जास्त खात्रीने आणि जास्त प्रमाणात सारा आणि अन्य कर जमा करण्यासाठी जास्तीत जास्त बागायत जमीन असणे आवश्यक होते. ब्राह्मण आणि वरच्या जातींचे हितसंबंध या पाणी व्यवस्थेशी पक्के जोडलेले होते. मंदिरांना जास्तीत जास्त देणग्या जमा करणे आणि संबंधित ब्राह्मणांचा पाठिंबा मिळवणे ही सुद्धा एक प्रक्रिया या व्यवस्थेशी संबंधित होती. तंजावरचे राजे आणि तिरूचिरापल्लीचे नवाब यांच्यामध्ये असलेला, वरचेवर होणाऱ्या संघर्षाचा मुद्दा, कावेरी नदीच्या पाट-पाणी व्यवस्थेवरील नियंत्रणाचा होता. हे उदाहरण म्हणून ध्यानात घेतले पाहिजे.

राजकीय सत्तेचा पाया मजबूत ठेवण्यासाठी, धार्मिक सत्ताकेंद्रांना आधार देण्यासाठी, जास्तीत जास्त आणि खात्रीचे वरकड उत्पादन या दोन्ही सत्ता केंद्राकडे जमा होण्यासाठी या पाणीपुरवठा व्यवस्थेचा उपयोग शतकानुशतके केला गेला आहे. जातिव्यवस्थेच्या उतरंडीमधून होणारे शोषण हा या व्यवस्थेचा पाया होता. त्यामुळे 'स्थानिक समाजाच्या नियंत्रणातली पाणी व्यवस्था' असे या व्यवस्थेचे उदात्तीकरण करणे चूक आहे. पाणी-जमीन संबंधाची ही व्यवस्था केंद्रीय राजसत्तेच्या नियंत्रणाच्या दृष्टीने विकेंद्रित होती, हे खरेच आहे. पण या विकेंद्रित यंत्रणेचा ताबा स्थानिक पातळीवर ब्राह्मण आणि अन्य उच्च जातीयांकडे होता. इतर जातींकडे जमीन नव्हती किंवा कमी होती. काही जातीचे लोक ब्राह्मण आणि उच्च जातीयांच्या मालकीच्या जमिनी 'कुळ' म्हणून कसत होते. श्रमाची कामे दलित आणि अन्य शेतकरी जातींमधले लोक करीत होते. आणि मोठ्या प्रमाणातले वरकड राजा आणि ब्राह्मण व उच्च जातीयांकडे जात होते. अर्थात एक उत्पादन साधन म्हणून पाण्यावरचे नियंत्रण स्थानिक पातळीवर ब्राह्मण आणि उच्च जातीयांकडे होते. आणि पाणीपुरवठा चालवण्यावर सुद्धा त्यांचेच नियंत्रण होते. बहुसंख्य असलेल्या आणि कष्ट करून जगणाऱ्या शेतकरी (कुळवाडी) जातींपासून ते दलितांपर्यंत राबणाऱ्या स्त्री-पुरुषांचे शोषण करण्याचे आणि राजांची सत्ता पक्की

ठेवण्याचे साधन म्हणून पाणी वापरले जात होते. पाण्याचे ब्राह्मणी जातीव्यवस्थाक राजकारण असे होते.

### ब्रिटिश साम्राज्यशाहीचे पाणी, जमीन,जंगल धोरण

पारंपारिक पाणी-जमीन व्यवस्था ब्रिटिश साम्राज्यशाहीच्या उगवत्या काळात कोलमडली. एकंदर सामाजिक-आर्थिक व्यवस्थेने कुशी बदलण्याचा, काही मूलभूत बदलही घडवण्याचा काळ सुरू झाला होता. ब्रिटिश साम्राज्यशाहीने स्वतःच्या प्रभुत्वासाठी सुरू केलेल्या युद्धांच्या काळात जुन्या अनेक यंत्रणांना इजा झाली. पाणी, जमीन, जंगल संबंधांच्या व्यवस्थेलाही इजा झाली.

### आधुनिक विज्ञानाचा उपयोग, पारंपारिक तंत्राकडे दुर्लक्ष

त्या काळात निसर्ग विज्ञानाचा जो काही विकास झाला होता, त्या आधारावर उदयाला आलेल्या आधुनिक कारखानदारी आणि व्यापारी भांडवली व्यवस्थेचे प्रतिनिधित्व ब्रिटिश सत्ता करत होती. भारताच्या विविध भागांमधली पाणी-जमीन संबंधांची यंत्रणा फारच व्यापक आणि प्रगत होती, पण आधुनिक विज्ञानाच्या पद्धतीने यामागे असणाऱ्या ज्ञानाची व्यवस्था लावण्यात आली नव्हती. इंग्रजांनी सत्तेने अशी व्यवस्था लावायला सुरुवात केली, पारंपारिक पाणी-जमीन संबंधांची, सिंचन व्यवस्थांची पहिली सविस्तर पाहाणी आणि अभ्यास ब्रिटिश सत्तेच्या तज्ज्ञांनी केला आहे.

पर्जन्यमान मोजण्याची आणि त्यासाठी केंद्र स्थापन करून दरवर्षीच्या पर्जन्यमानाची नोंद ठेवण्याची पद्धत या काळातच सुरू झाली. त्यामुळेच आज दुष्काळ निर्मूलनाचा विचार करताना आपल्याला, वेगवेगळ्या तालुक्यांचे, अनेक वर्षांचे पर्जन्यमान मिळू शकते. त्या आधारावर आपण त्या त्या तालुक्यात स्थानिक पाणलोटक्षेत्र विकासातून किती पाणी उपलब्ध होऊ शकते याचे गणित मांडू शकतो. बाहेरून किती प्रमाणात पाणी आणावे लागेल ते ठरवू शकतो. पन्नास वर्षांचे पर्जन्यमान मांडून ७५ टक्के वर्षांमध्ये पडणारा खात्रीचा पाऊस किती याचा निष्कर्ष काढता येतो. छोटी मोठी धरणे आणि तलाव बांधताना या सर्व गोष्टींची आवश्यकता असते.

संपूर्ण देशाचे उंच सखलतेचे नकाशे (कंटूर मॅप्स) प्रथम ब्रिटिश सत्तेच्या तज्ज्ञ अधिकाऱ्यांनीच तयार केले. असे नकाशे असल्याशिवाय एखाद्या पाणलोटक्षेत्रात किती पाणी अडवले जाऊ शकते हे नक्की काढता येत नाही. यासाठी आवश्यक विविध घटकांचा विचार करून इंग्लिश नावाच्या तज्ज्ञाने काढलेला फॉर्म्युला आजही आपले पाटबंधारे खाते वापरत आहे. एकदा असे उंच सखलतेचे नकाशे आणि पर्जन्यमान इत्यादी मूलभूत माहिती हाताशी असेल तर सिंचन व्यवस्थेचे प्राथमिक नियोजन प्रत्यक्ष क्षेत्रात न जाता अगदी नेमकेपणाने करता येते.

या सर्व अभ्यासाचा आणि वैज्ञानिक पद्धतीचा म्हणून ब्रिटिश अधिकाऱ्यांनी सर्व नद्यांची खोरी नकाशांवर आणली. खोरेनिहाय पाण्याची आखणी करण्याचा आधार तयार केला.

पारंपारिक पाणी - जमीन संबंधाची आणि सिंचन व्यवस्थापनाची पहिली अभ्यासपूर्ण आणि व्यापक माहिती ब्रिटिश सत्तेच्या अधिकारी आणि तज्ज्ञांनी एकत्रित केली, पण सत्ताधारी म्हणून मात्र ब्रिटिशांनी या पारंपारिक व्यवस्थांकडे, यंत्रणांकडे दुर्लक्ष केले. यांना जास्तच मोडकळीला येऊ दिले. जेवढ्या प्रमाणात या सिंचन व्यवस्थेकडे त्यांनी लक्ष दिले, तेवढ्या प्रमाणात त्यांची नव्या सिंचन व्यवस्थेशी सांधेजोड करण्याचा प्रयत्न केला नाही. आधुनिक विज्ञानाच्या आधारावर या व्यवस्थेचा विकास करण्याचा प्रयत्न तर दूरच राहिला. अमन धपक्या पद्धतीने एकदमच मोठी किंवा महाकाय धरणे बांधायची आणि स्थानिक पाणलोट क्षेत्र विकासातून उपलब्ध होणाऱ्या पाण्याकडे दुर्लक्ष करायचे हे ब्रिटिश सत्तेच्या धोरणाचे मुख्य सूत्र बनले.

(पान क्र. ५०वर)

माध्यमा

# मराठी मालिका : लिंगभावी दृष्टिकोनातून २

रेणुका कड
व
प्रवीण घोडेस्वार

सध्या 'स्टार प्रवाह' ह्या दूरचित्रवाणी वाहिनीवर सुरु असलेली 'फुलाला सुगंध मातीचा' ही मालिका पूर्वी स्टार प्लसवर हिंदीमध्ये 'दिया और बाती' या नावाने प्रक्षेपित झालेली आहे. टीव्हीवरील मालिकांचा सर्व भाषांमध्ये रिमेक करण्याचा ट्रेंड आला आहे. यातलीच 'फुलाला सुगंध मातीचा' ही मालिका होय. या मालिकेतील 'किर्ती' एक अत्यंत हुशार आणि प्रतिभावान मुलगी. घरात आई-वडील आणि एक मोठा भाऊ असे तिचे चौकोनी कुटुंब. शिक्षण पूर्ण करून भारतीय पोलिस प्रशासन सेवेत (आयपीएस) ऑफिसर होण्याचे तिचे स्वप्न असते. तिचे वडील सगळ्या प्रयत्नात तिला मार्गदर्शन करतात. किर्तीचे वडील तिच्यासाठी खरे आयडॉल असतात. परंतु एका घटनेमध्ये तिच्या आई-वडिलांचा मृत्यू होतो. तिच्या भावाला आणि वहिनीला नोकरीसाठी परदेशी स्थायिक व्हायचे असते. आई-वडील आकस्मिक गेल्यानंतर किर्तीची जबाबदारी आपल्यावर येऊन पडली असा विचार करून भाऊ तिचे लग्न एका नववी शिकलेल्या आणि शिर्डीसारख्या छोट्या गावात हॉटेल चालवणाऱ्या शुभमसोबत लावून देतो. किर्तीचे लग्न ठरवताना तिचे कोणतेही मत, आवड-निवड तो विचारात घेत नाही. हे लग्न तिच्या भाऊ-वहिनीच्या इच्छेनुसार लावून दिले जाते. आयपीएस ऑफिसर बनण्याचे स्वप्न उराशी बाळगणारी किर्ती नवऱ्याच्या हॉटेल कामात आणि घरकामात गुंतलेली दिसून येते.

किर्तीच्या सासरी सासू-सासरे, दोन दीर आणि एक नणंद असे कुटुंब असते. किर्तीची सासू एक शिस्तप्रिय, कडक स्वभावाची, खोटे बोललेले खपवून न घेणारी आणि संपूर्ण घरावर ताबा असलेली सासू (जिजीअक्का) असते. तर सासरे (भाऊ) स्वभावाने शांत आणि समंजस दाखवले आहेत. पूर्वी काही कारणामुळे त्यांनी काम करणे सोडलेले आहे; ते पुन्हा काम करत नाहीत. परिणामी घर चालविण्याची सगळी जबाबदारी शुभमवर (किर्तीचा नवरा) येते. लहान वयातच शिक्षण अर्थवट सोडून शुभम संपूर्ण घराची जबाबदारी उचलतो. जिजीअक्काचा शब्द त्याच्यासाठी शेवटचा शब्द असतो. जिजीअक्काला घरात सुनेने सगळे काम करणे अपेक्षित असते. तिने कुटुंबाची जबाबदारी उचलली पाहिजे असे त्यांचे मत असते. अशा घरात किर्ती लग्न करून येते. लग्न झाल्यावर किर्तीला साडी नेसण्यापासून ते तिला स्वयंपाकघरात कोणते काम येत नाही इथपर्यंतच्या सगळ्या कामात जिजीअक्कांकडून बोलणे ऐकावे लागते. या मालिकेतील सर्व टप्प्यात वेगवेगळे प्रसंग उभे केलेले आहेत. प्रत्येक प्रसंग एक वेगळी बायलाइन घेऊन चित्रित

---

लेखिका मुंबईस्थित विकास अध्ययन केंद्रात कार्यरत असून लेखक नाशिकस्थित यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या मानव्यविद्या व सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे प्रभारी संचालक आहेत.
ईमेल - rkpatil3@gmail.com
gpraveen18feb@gmail.com

केला आहे. किर्ती आणि शुभमचे लग्न म्हणजे 'अजब खेळ नियतीचा, फुलाला सुगंध मातीचा'.

लग्नानंतर किर्ती आणि शुभम जेव्हा एकत्र येतात त्यावेळी दोघेही एकमेकांना समजून घेत वेळ देतात. मात्र आपला मुलगा आणि सून लग्न होऊनही एकत्र आले नाहीत, याचा सर्व राग जिजीअक्का किर्तीवर काढते. किर्तीसाठी शुभमने आणलेले कानातले जिजीअक्काला न विचारता आणले म्हणून जिजीअक्का त्याच्यावरही राग धरते. घरात आलेली आणि आपल्या मुलापेक्षा जास्त शिकलेली सून आपल्या मुलाला तिच्या ताब्यात ठेवेल ही भीती जिजीअक्काच्या मनात तयार होते. किर्ती आणि शुभममध्ये हळूहळू संवाद सुरू होतो तेव्हा किर्ती त्याला आपले शिक्षण पूर्ण करण्याबद्दल विचारते आणि पोलिस अधिकारी बनण्याचे स्वप्न असल्याचे सांगते. इथून पुढे सुरू होते घरातील द्वंद. सुनेला शिकायची काय गरज आहे? आपल्या मुलापेक्षा सून अधिक शिकलेली नको असा विचार जिजीअक्का करत असते. एका प्रसंगात किर्ती आणि जिजीअक्का जेव्हा बाजारात जातात तेव्हा एक उधळलेला बैल तिच्या सासूला शिंग मारेल अशी परिस्थिती तयार होते. त्यावेळी किर्ती पूर्ण ताकदीनिशी त्या बैलाला रोखण्यात यशस्वी होते. बाजारात सगळे किर्तीचे आणि तिच्या सासूचे कौतुक करतात. पण घरी आल्यावर जिजीअक्का किर्तीला, 'मला घरात लक्ष्मी पाहिजे दुर्गा नको' असे बोलून दाखवतात. आपल्या बायकोचे स्वप्न पूर्ण करायचे पण आईचा नकार होकारात कसा बदलायचा या आव्हानाला तोंड देत शुभम बायकोच्या बाजूने उभा राहतो. किर्तीच्या शिक्षणाची पुन्हा सुरुवात होते. मात्र तिने सर्व घरकाम करायला हवे ही अट मान्य करूनच किर्तीला शिकण्याची परवानगी मिळते.

'स्टार प्रवाह' या वाहिनीवर 'लग्नाची बेडी' ही दुसरी एक मालिका सुरू आहे. स्टार प्लसवरील 'गुम है किसी के प्यार में' या हिंदी मालिकेचा हा रिमेक आहे. या मालिकेतील मुख्य पात्र असलेली सिंधू सावंत एका कर्तव्यदक्ष पोलिस अधिकाऱ्याची मुलगी असते. सिंधू ही कोकणात वाढलेली मुलगी आहे. लहानशा गावात वाढूनही तिची शिकण्याची इच्छा प्रबळ असते. चांगले शिक्षण घेऊन डॉक्टर बनण्याचे तिचे स्वप्न असते. डॉक्टर झाल्यावर गावातल्या लोकांची सेवा करण्याची तिची इच्छा असते. महत्त्वाकांक्षी आणि खंबीर असे व्यक्तिमत्व असलेली सिंधू ही मुलगी आहे. ती कोणत्याही परिस्थितीत ठामपणे उभी राहणारी आणि स्वत:ची मतं निर्भीडपणे मांडणारी आहे. सिंधूचे तिच्या वडिलांवर खूप प्रेम आहे. त्यांची ती मनापासून सेवा करते. मात्र एका अपघातात तिच्या वडिलांचे निधन होते. वडिलांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या सिंधूचे पितृछत्र हरपते. तिच्या वडिलांकडे नव्याने आयपीएस म्हणून सेवेत दाखल झालेला राघव रत्नपारखी हा हुशार आणि कर्तबगार अधिकारी असतो. सिंधूचे वडील त्यांच्या शेवटच्या क्षणी राघवने आपल्या मुलीची जबाबदारी घ्यावी असे वचन त्याच्याकडून घेतात. आपल्या ज्येष्ठ अधिकाऱ्याला दिलेला शब्द पाळण्यासाठी राघव सिंधूला त्याच्यासोबत घेऊन जाण्याचा निर्णय घेतो, पण गावातील मुलगी परक्या पुरुषासोबत कशी जाऊ शकते? राघवला सिंधूला सोबत घेऊन जायचे असेल तर तिला त्याच्याशी लग्न करावे लागेल अशी गळ घातली जाते. मग या दोघांचे लग्न होते.

ह्या दोन्ही मालिकेतील मुली किर्ती आणि सिंधू या शिक्षण आणि करियरबाबतीत फोकस्ड असतात. शिक्षण पूर्ण झाल्यावर एकीला आयपीएस ऑफिसर व्हायचे असते तर एकीला डॉक्टर. किर्ती पदवीच्या दुसऱ्या वर्षात असतांना तिचे लग्न जबाबदारी म्हणून लावून दिले जाते. सिंधूचे लग्न तिने बारावीची परीक्षा दिलेली असताना आणि मेडिकलला प्रवेश घेण्यासाठी निकालाची प्रतीक्षा करत असताना झालेले असते. त्याच वेळी नेमका तिच्या वडिलांचा मृत्यू झाल्याने

एक जबाबदारी म्हणून तिचे लग्न लावून दिले जाते. प्रसार माध्यमातून दाखवल्या जाणाऱ्या मालिका नाट्यमय असल्या तरी त्यातून समाजासाठी दिला जाणारा संदेश महत्त्वाचा आणि तितकाच गंभीर आहे. एकीकडे प्रसार माध्यमातून स्त्रियांची प्रगती, मुलगी शिकली प्रगती झाली, बेटी बचाव, माझी कन्या भाग्यश्री असे नारे दिले जात असताना दुसरीकडे आई-वडील गेल्यावर मुलगी भावासाठी जबाबदारी असते, एकटी मुलगी गावासाठी जबाबदारी असते. आई-वडील गेल्यावर एकट्याने आयुष्य जगणे सोपे नाहीये हे मान्यच पण मुलगी एकटी जगूच शकत नाही; तिला पुरुष म्हणून पतीच्या आधाराची गरज असते असा संदेश या मालिकांमधून दिला जात आहे. दुसरी बाब म्हणजे या मालिकेतील मुली शिक्षण, करियर म्हणून जागरूक असतात पण आपल्यासोबत आपल्या भावाने अन्याय केला किंवा चुकीचा निर्णय घेतला याबद्दल काहीच मत व्यक्त करताना दिसून येत नाहीत. तिसरी बाब म्हणजे पदवीच्या दुसऱ्या वर्षात शिकणारी किर्ती वय साधारण १९-२० वर्ष, बारावीची परीक्षा दिलेली सिंधू म्हणजे वय १७ वर्ष फारफार तर १८ वर्ष. ज्यांच्या सोबत यांचे लग्न होताना दाखवले ते पुरुष त्यांच्यापेक्षा वयाने १०-१२ वर्षांनी मोठे आहेत. बारावीची मुलगी आणि आयपीएस असलेला तरुण. चौथी बाब म्हणजे या सगळ्या मालिकेतील घरातील ज्येष्ठ मंडळीमध्ये कुटुंबातील वाद-विवाद, हेवेदावे, एक स्त्री दुसऱ्या स्त्रीसोबत दुजाभाव करणारी असे चित्रण केलेले आढळते. प्रमुख स्त्रीच्या बाजूने कुटुंबातील अन्य पुरुष तिच्या बाजूने ती स्त्री कशी घर जोडणारी आहे हे सांगत असतात तर त्याच प्रमुख स्त्रीचा नवरा आपली बायको कशी चुकीची आहे हे तिला बोलून दाखवत असतो. एकूणच याचा अर्थ काय तर सासरा चांगलाच असतो पण सासू खाष्ट असते. स्त्रीच स्त्रीची शत्रू असते असे विचार बिंबविण्याचे षडयंत्र हे नकळतपणे डेली सोपच्या माध्यमातून घराघरात पसरवण्यात येत आहे.

अशा मालिकांच्या माध्यमातून पारंपरिक पुरुषप्रधान विचारप्रणालीचे मूल्य रुजवण्याचा हा प्रयत्न म्हटला पाहिजे. हे खूप चिंताजनक आहे. स्त्री-पुरुष समानता मानणाऱ्या प्रत्येकाने अशा मालिकांच्या विरोधात आवर्जून आपले मत व्यक्त करणे गरजेचे आहे. आज जर या विरोधात आवाज उठवला नाही तर भविष्यातदेखील अशाच प्रकारच्या कथानकावर आधारित मालिका प्रेक्षकांना पाहणे भाग पडेल. या मालिकांमुळे लहान बालक, नवतरुण समूहावर पुरुषसत्ताक विचारसरणीचा प्रभाव गडद होण्याची दाट शक्यता आहे. असे होणे आधुनिक काळात धोकादायक आणि समाजस्वास्थ्यासाठी बाधक आहे!

●

---

**नितीश नवसागरे...** (पृष्ठ क्र. १६वरून)

सार्वजनिक सुरक्षेचा उपाय म्हणून कोणत्याही सार्वजनिक ठिकाणी चेहरा झाकण्यावर बंदी घालण्यात आली आहे, असे नमूद केले आहे. हा योगायोगच म्हणावा की काय, कर्नाटक सरकारने काढलेला दिनांक ५.२.२०२२चा सरकारी आदेश हा सार्वजनिक सुरक्षेचा उपाय म्हणूनच गणवेशाची सक्ती सर्वांवर करतो व यामुळे मुस्लीम मुलींना शाळेमध्ये हिजाब घालता येत नाही. भारतामधील हिजाब प्रकरण हे फक्त शाळांपुरते मर्यादित नाही. तर कर्नाटकमध्ये हिजाबच्या वादाच्या दरम्यान हिंदुत्ववादी संघटनांनी हैदोस घातला होता. भगवे उपरणे घालून, झुंडीने महाविद्यालयामध्ये प्रवेश करणे, जय श्रीरामचा घोष करणे असले सर्व प्रकार झाले. हिजाबच्या मुद्द्याआडून मुस्लीम समाजाला लक्ष्य करण्यात येत होते. समाजामध्ये धार्मिक ध्रुवीकरण करण्याचा प्रकार स्पष्ट दिसत होता. या सर्व पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालय काय निकाल देणार आहे, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

●